RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर    वर्ष ३३ वे    अंक २५४ वा    शनिवार    दिनांक २१ डिसेंबर, २०२४    (सायं. दैनिक)    पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26    पृष्ठे - ६    किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८


## रशियाच्या कझानमध्ये ९/११ सारखा हल्ला:युक्रेनने ८ ड्रोन डागले, ६ निवासी इमारती लक्ष्य ;कझान विमानतळावर सर्व उड्डाणे थांबवली




मॉस्को(वृत्तसेवा)-रशियातील कझान शहरात शनिवारी सकाळी अमेरिकेतील ९/११ सारखा हल्ला झाला. वृत्तसंस्था रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, युक्रेनने कझानमध्ये ८ ड्रोन हल्ले केले, त्यापैकी ६ निवासी इमारतींवर झाले. हा हल्ला मॉस्कोपासून ८०० किलोमीटर अंतरावर झाला. आतापर्यंत या हल्ल्यात कोणीही मारले गेल्याचे वृत्त नाही.

या हल्ल्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये अनेक ड्रोन इमारतींवर आदळताना दिसत आहेत. या हल्ल्यांनंतर रशियाचे दोन विमानतळ बंद करण्यात आले आहेत.

२००१ मध्ये अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवाद्यांनी अशाच पद्धतीने ४ विमानांचे अपहरण केले होते. यापैकी ३ विमाने अमेरिकेतील ३ महत्त्वाच्या इमारतींवर एकामागून एक कोसळली. पहिला अपघात रात्री ८:४५ वाजता झाला. बोईंग ७६७ हे विमान वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या नॉर्थ टॉवरवर वेगाने आदळले. १८ मिनिटांनंतर, दुसरे बोईंग ७६७ इमारतीच्या दक्षिण टॉवरवर आदळले.

४ महिन्यांपूर्वी रशियावर असाच हल्ला झाला होता. युक्रेनने रशियातील सेराटोव्ह शहरातील व्होल्गा स्काय या ३८ मजली निवासी इमारतीला लक्ष्य केले होते. रशियाचा स्ट्रॅटेजिक बॉम्बर लष्करी तळही येथे आहे. या हल्ल्यात ४ जण जखमी झाले आहेत. यानंतर रशियाने प्रत्युत्तर देत युक्रेनवर १०० मिसाईल आणि १०० ड्रोन डागले. यात सहा जणांचा मृत्यू झाला असून दीडशेहून अधिक जण जखमी झाले आहेत.

**रशियाच्या आण्विक प्रमुखाची ४ दिवसांपूर्वी हत्या करण्यात आली होती**

अवघ्या चार दिवसांपूर्वी रशियाचे अण्वस्त्र प्रमुख इगोर किरिलोव्ह यांचा मंगळवारी मॉस्कोमध्ये झालेल्या स्फोटात मृत्यू झाला. हल्ल्याच्या वेळी, किरिलोव्ह अपार्टमेंटमधून बाहेर पडत असताना जवळ उभ्या असलेल्या स्कूटरचा स्फोट झाला. यामध्ये किरिलोव्हसोबत त्यांचा सहाय्यकही मारला गेला.

वृत्तसंस्था रॉयटर्सने युक्रेनच्या अधिकाऱ्यांच्या हवाल्याने म्हटले होते की, किरिलोव्हची हत्या युक्रेननेच केली होती. मीडिया रिपोर्ट्सनुसार, युक्रेनच्या सिक्युरिटी सर्व्हिस एजन्सी (एसबीयू) शी संबंधित एका सूत्राने याची जबाबदारी घेतली होती.

**पुतिन यांनी दोन दिवसांपूर्वी युद्ध थांबवण्यास तयार असल्याचे सांगितले होते**

दोनच दिवसांपूर्वी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी युक्रेन युद्ध थांबवण्यास तयार असल्याचे सांगितले होते. यासाठी ते ट्रम्प यांच्याशी बोलण्यास तयार आहेत. पुतिन म्हणाले की, त्यांच्यामध्ये चार वर्षांहून अधिक काळ चर्चा झालेली नाही, पण ट्रम्प यांची इच्छा असेल तर ते त्यांना भेटण्यास तयार आहेत.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, बायडेन सरकार लवकरच युक्रेनसाठी शेवटचे सिक्युरिटी असिस्टन्स इनिशिएटिव्ह पॅकेज जाहीर करेल. अंदाजानुसार, युक्रेनला १.२ बिलियनचे पॅकेज दिले जाईल. मात्र, खरी रक्कम जाहीर झाल्यानंतरच स्पष्ट होईल.

## शरद पवारांनी दिला धीर: मुलींचे शिक्षणही करणार



बीड (प्रतिनिधी)-शरद पवार यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे. मस्साजोग हत्या प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक कोर्टात चालवा अशी मागणी त्यांच्या कुटुंबीयांनी केली आहे. तर संतोष देशमुख यांच्या मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी आम्ही घ्यायला तयार आहोत, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. देशमुख कुटुंब एकटे नाही, आम्ही सर्व त्यांच्या पाठिशी आहोत.

दरम्यान शरद पवार म्हणाले की, बीड जिल्ह्यात दहशतीचे वातावरण आहे. त्यातून सर्वजणासंनी सोबत येत यातून बाहेर पडले पाहिजे, असे म्हणत अप्रत्यक्ष मुंडेंवर निशाणा साधला आहे. तर संदीप क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड यांनी हा मुद्दा सभागृहात मांडला आहे. तर बजरंग सोनवणेंनी हत्येचा मुद्दा उचलून धरला आहे. या हत्येमागे सूत्रधार कोण हे मुळात जाऊन शोधणं गरजेचे आहे. केंद्र-राज्य सरकारने या प्रकरणाची नोंद घेतली पाहिजे. संतोष देशमुख यांच्या मुलीच्या शिक्षणाचा खर्च उचलायला आम्ही तयार आहोत.

## मंत्री झाल्यानंतर प्रथमच बाबासाहेब पाटील यांचा लातूर जिल्हा दौरा



लातूर (प्रतिनिधी)-राज्याचे मंत्री बाबासाहेब पाटील हे रविवार, २२ डिसेंबर २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

मंत्री ना. पाटील यांचे २२ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता अहमदपूर तालुक्यातील सांगवी फाटा येथे आगमन होईल. त्यानंतर भक्तीस्थळ येथे राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज समाधी दर्शन घेतील. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, टिपू सुलतान स्मारक येथे त्यांचे स्वागत, सत्कार समारोह होईल. त्यानंतर स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन, महात्मा बसवेश्वर चौक येथे अभिवादन करतील. हॉटेल भगीरथी समोर त्यांचे स्वागत, सत्कार होईल. त्यानंतर अहमदपूर येथील प्रसाद गार्डन येथे बालाजी विनायक पाटील यांच्या मुलीच्या विवाह प्रसंगी सदिच्छा भेट देतील. शिरूर ताजबंद येथील बालाजी मंदिर येथे दर्शन, तसेच राजकुमार प्रभाकर चव्हाण यांच्या मुलीच्या विवाह प्रसंगी सदिच्छा भेट देतील.

ना. पाटील यांचे दुपारी २.१५ वाजता शिरूर ताजबंद येथील शिवछत्रपती नगर येथे इंद्रायणी निवासस्थानी आगमन होईल व राखीव. त्यानंतर शिरूर येथील महादेव मंदिर येथे दर्शन व मंदिर व्यवस्थापन समितीमार्फत स्वागत, सत्कार समारोह कार्यक्रमाल उपस्थित राहतील. शिरूर ताजबंद येथील शिरूर मुखेड रोडवर शिवराज पाटील आंबेगावकर यांच्या आईसाहेब मेडिकल स्टोअर्स उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहतील. त्यानंतर मुक्ताई हार्डवेअर उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहतील. यानंतर चाकूर बसस्थानकासमोर महायुतीमार्फत आयोजित स्वागत, सत्कार समारंभाला उपस्थित राहतील. चाकूर येथील माझी माय मंगल कार्यालय येथे अरविंद शेट्टे यांच्या मुलीच्या विवाहप्रसंगी सदिच्छा भेट देतील. अहमदपूर येथे बालासाहेब पाटील आंबेगावकर यांच्या घरगुती कार्यक्रमाला सदिच्छा भेट देतील. रात्री ८.१५ वाजता शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थान येथे आगमन व राखीव.

### आयुष्यमान

अति महत्वकांक्षेला
सरळदाखव अस्मान
आकाश नको ठेंगणे
न्हावे लागेल भस्मानं
बंडखोरी दडपू टाका
घालेल उगाचं थैमान
कटूनिर्णय धाडसाचे
जोशात काढ फर्मान
सोसेल रूचेल तेवढा
गुपचुप करा अपमान
डोईवरून नको पाणी
कशास फुकटचामान
कायम ठेवावे सत्तेत
भले चांगले विद्यमान
कार्यकुशल निष्ठावान
योग्य साधे विद्या मान
भ्रष्टाचार शिंतोडेथोडे
वाकवेल तीर कमान
शुध्द चरित्र येता नेता
उंचवावी उंच कमान
स्थिर स्थावर निश्चित
धष्ट पुष्ट हवे यजमान
येतेलं अन् जातीलही
अस्थिर असे मेहमान
निष्ठेने करा जन सेवा
सत्ताहोई आयुष्यमान
मुश्कीले लाभे सुसंधी
जन भावनेचा सन्मान

**- हेमंत मुसरीफ पुणे**
मो.९७३०३०६९९६

## क्रीडा सप्ताहअंतर्गत स्पर्धामधील विजेत्यांना बक्षीस वितरण




लातूर (प्रतिनिधी)-क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात दि. १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात आला. याअंतर्गत आयोजित क्रीडा सप्ताहानिमित्ताने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर यांच्यामार्फत १२ ते १८ डिसेंबर, २०२४ या कालावधीत जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजयी खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत पदके आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

तसेच जिल्हा क्रीडा संकुल येथे लातूर जिल्ह्यातील कुस्ती व जिम्नॅस्टीक खेळांच्या खेळाडूंनी प्रात्यक्षीके सादर करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी खेळाडूंना खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी गुरूमंत्र दिला. याप्रसंगी नेताजी जाधव, थेलॅटीक्स कोच समाधान बुरगे, राहुल होनसांगळे, लायक सय्यद, अमजद शेख, जिम्नॅस्टीक कोच आशा झुंजे, कुस्तीकोच चेतन जावळे, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे, धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, सागर पोतदार, प्रसाद वैद्य आदी उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी जिल्ह्यातील विविध खेळाच्या स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विजयी खेळाडूंना प्रमाणपत्र व पदकांचे वाटप प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले तर आभार तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका क्रीडा अधिकारी सारीका काळे, सुरेंद्र कराड, राज्य क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंढे, चंद्रकांत लोदगेकर, क्रीडा अधिकारी कैलास लटके, कृष्णा केंद्रे, धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, प्रवीण कांबळे, चेतन जावळे, गणेश वंगवाड, तेजस गोरे, प्रसाद वैद्य यांनी प्रयत्न केले.

## मोकाट जनावरे पकडण्यासाठी मनपाची मोहीम दीड लाखाचा दंड वसूल

लातूर (प्रतिनिधी)-:शहरात फिरणारी मोकाट जनावारे पकडण्याची मोहीम मनपाने अशोक सेवा स्वच्छता सेवा मंडल यांच्या मार्फत हाती घेतली असून याअंतर्गत आतापर्यंत १५० जनावरे पकडण्यात आली आहेत.संबंधिताकडून एकूण १ लाख ५१ हजार ५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

शहरात फिरणाऱ्या मोकाट गायी,बैल,म्हैस,रेडा,गाढव,शेळ्या आदी पशुना पकडण्यासाठी ही मोहीम सुरु करण्यात आली आहे.या अंतर्गत दि.१६ पर्यंत १५० जनावरे पकडून सिकंदरपूर येथील कोंडवाड्यात बंदिस्त करण्यात आली होती.त्यापैकी ३४ जनावराच्या मालकाकडून १ लाख ५१ हजार ५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.ही सर्व जनावरे सिकंदरपुर येथे कोंडवाडा विभागात ठेवण्यात आली होती.मनपाच्या वतीने बेवारस म्हणून घोषित करण्यात आलेल्या ९५ जनावरांचे कायमस्वरूपी संगोपन करण्यासाठी



ती जनावरे अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या तीन गोशाळांना सुपूर्द करण्यात आली आहेत. सध्या मनपाकडे ९ मोकाट जनावरे शिल्लक आहेत.

मनपाच्या वतीने मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम यापुढेही सुरूच राहणार आहे.त्यामुळे शहरातील पशुपालकांनी आपली जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू नयेत,अन्यथा ती पकडून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा पालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**मंत्री तर झाले,**
**पण बिन खात्याचे.....**




वाहातुकीची कोंडी वाढली आहे!
अतिक्रमण वाढले आहे!!
ओरड मात्र चालू आहे!!!
रस्ते अरुंद बनले आहेत!!!!

## लातूर जिल्ह्यात सुशासन सप्ताहाचे आयोजन

लातूर(प्रतिनिधी)-शासकीय कार्यालयात असलेल्या प्रलंबित तक्रारींचे निवारण युद्ध पातळीवर करण्यासाठी १९ ते २४ डिसेंबर २०२४ या काळात लातूर जिल्ह्यात सुशासन सप्ताह राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. या अंतर्गत जिल्ह्यात मप्रशासन गाव की ओर हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचे उद्घाटन प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या उपस्थितीत गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाले.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी प्रियांका आयरे, अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

प्रशासनिक सुधार तथा लोक शिकायत विभाग कार्मिक, लोक शिकायत और पेंशन मंत्रालय यांच्या निर्देशानुसार हा सप्ताह राबविण्यात येत आहे. या अभियानात विविध शासकीय कार्यालयात प्रलंबित विविध तक्रारीचे निवारण युद्ध पातळीवर करण्यात येणार आहे. तसेच विविध सेवा पुरविणेबाबत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.




अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिकांना आपले सरकार पोर्टल, सीपीजीआरएएमएस इत्यादी पोर्टलवरील तक्रारी नोंदविता येतील. या व्यतिरिक्त महाऑनलाईन पोर्टलवर विविध सेवासाठी अर्ज करता येईल. तसेच आयोजित विशेष शिबिरामध्ये अर्ज दाखल करता येतील.

या अभियानातंर्गत दाखल तक्रारी अथवा अर्ज यावर प्रथम प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल.

तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सहभाग नोंदवावा व आपली गाऱ्हाणी व विविध सेवासाठींचे अर्ज दाखल करावेत, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## पाकिस्तानावर विश्वास ठेवणे धोकादायक

पाकिस्तान या देशावर विश्वास ठेवणे धोकदायक आहे. कधी व कोणत्योवळी धोका देवु शकतो हे सांगता येत नाही.आता पाकिस्तान कंगाल देश, आर्थिकदृष्टया कमकुवत देश असताना तो बॅलेस्टिक क्षेपणास्त्र बनवत आहे. या क्षेपणास्त्राबाबत अमेरिकेने इशारा दिला आहे. अमेरिकेने पाकिस्तानला जोरदार झटका देत चार कंपन्यांवर बंदी घातली आहे. त्यामुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे. अमेरिकेचे उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जोनाथन फाइनर यांनी भीती व्यक्त केली. जोनाथन फाइनर म्हणाले, 'पाकिस्तान जे क्षेपणास्त्र बनवत आहे ते दक्षिण आशियाबाहेर अमेरिकेवर हल्ला करण्यात यशस्वी ठरेल. त्यामुळे पाकिस्तानच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे आणि त्यांना ही क्षमता मिळण्यापासून रोखण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. जागतिक शांततेसाठी आयोजित केलेल्या एका संघटनेत बोलताना फिनर म्हणाले की, पाकिस्तान अमेरिकेवर हल्ला करण्याचा प्रयत्न करू शकतो, असे वाटणे कठीण आहे, पण ते अमेरिकेसाठी धोका निर्माण करु शकते. लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची निर्मिती करण्याच्या पाकिस्तानच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने गुरुवारी पाकिस्तानवर नवीन निर्बंध लादले. अण्वस्त्रधारी पाकिस्तानने लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र विकसित केल्यास ते जगासाठी धोकादायक ठरू शकते, असे अमेरिकेचे मत आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर म्हणाले, हे निर्बंध पाकिस्तानच्या राष्ट्रीय विकास संकुल आणि तीन कंपन्यांना लागू होतील. या निर्बंधांचा उद्देश मोठ्या प्रमाणात होणारी जीवितहानी रोखणे हा आहे. निर्बंध लागू झाल्यानंतर अमेरिकेतील बंदी घातलेल्या कॉम्प्लेक्स आणि कंपन्यांची मालमत्ता जप्त केली जाईल आणि त्यांना अमेरिकेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यवसाय करता येणार नाही. याप्रमाणे त्यांच्याशी संबंधित असलेले लोकही अमेरिकेला जाऊ शकणार नाहीत. अमेरिकेच्या निर्बंधांच्या कक्षेत आलेल्या तीन कंपन्यांची नावे एफिलिएट्स इंटरनॅशनल, अख्तर अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि रॉकसाइड एंटरप्राइझ आहेत. या तीन कंपन्या कराची येथील आहेत. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या माहितीनुसार, इस्लामाबादस्थित एनडीसी लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या निर्मितीमध्ये गती देण्यासाठी आणि त्याच्या चाचणीसाठी आवश्यक उपकरणे मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये डेप्युटी एनएसए जोनाथन फाइनर, डेप्युटी सेक्रेटरी ऑफ स्टेट कर्ट एम कॅम्पबेल आणि भारतीय राजदूत विनय क्वात्रा यांच्यात झालेल्या बैठकीत मंगळवारी अमेरिकेने भारताला क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाच्या निर्यातीशी संबंधित कायद्यात सुधारणा करण्याचे संकेत दिले. बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या माहितीत म्हटले आहे की, दोन्ही देशांच्या उद्योगांमध्ये नवीन संधी निर्माण करण्यासाठी क्षेपणास्त्र तंत्रज्ञान निर्यातीच्या पुनरावलोकनाचे काम सुरू आहे. दोन देशांच्या कंपन्यांमध्ये अंतराळ यान प्रक्षेपणात सहकार्य करणे हा देखील त्याचा एक उद्देश आहे. पाकिस्तान कसा आहे. भारत अनेक वर्षापासून त्रास सहन करीत आहे. तो दहशदवादी देश आहे असे जगाला ओरडून सांगणारा देश आहे. याकडे जगाचे लक्ष नाही. जगाला भारताची तळमळ समजली नाही. आज अमेरिकेला धोक्याची चाहूल लागली आहे. त्यामुळे तो दम देत आहे. आज ना उद्या अमेरिकेला पाकिस्तान हात दाखविणार आहे. वर्ल्ड टावर उद्धस्थ केलेला लादेन हा पाकिस्तानी होता. त्याने अमेरिकेला चांगलाच हात दाखविला आहे. तरी अमेरिका पाकिस्तानाला पुळका आहे. अनेक बाबतीत आर्थिक मदत केली आहे. भारताविरोधात असताना मदत केली आहे. अमेरिका असो किंवा चीन याने दहशदवादाला खतपाणी घातले आहे. या बाबत भारताने सतत ओरडून सांगतले तरी या दोन मोठ्या देशाने लक्ष दिले नाही. त्यामुळे पाकिस्तान हा सतत माजल्या सारखे करीत आहे. मुळात भारताने त्याला वटणीवर आणण्याचा प्रयत्न केला. जम्मू काश्मीरात सतत घुसखोरी करीत आला आहे. जम्मूकाश्मीरात भाडोत्री अतिरेकी पाठवुन हिंसा घडविण्याचे काम केले आहे. त्याला भारतीय जवावाने चोख उत्तर देत आला आहे. पाकिस्तानाच त्रास सर्वाधिक भारताला होत आहे. मुळात भारताचा एक अविभाज्य भाग होता. भारतीय भुमी आहे. भारतापासून वेगळा प्रांत निर्माण झाला आहे. तरी भारताकडे सतत वाकडी नजर पाकची असते. आज पाकिस्तानमधीन स्थिती ही वाईट आहे. धार्मिकतेच्या आडून अन्याय-अत्याचार सुरु आहेत. जीवनाश्यक किंमती वाढल्या आहेत. तरी त्याची मस्ती जिरली नाही. लाखो रुपये खर्च करून क्षेपणास्त्र तयार करीत आहे तोही लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र करीत आहे. थेट अमेरिकेवर हल्ला करण्याची तयारी ठेवली आहे. यावरून पाकिस्तानची मजल कोठे पर्यंत आहे. याचा विचार केला पाहिजे. वेळीच पाकिस्तानला रोखले नाही तर मोठा अनर्थ जगाला भोगावा लागणार आहे. अगोदरच त्याच्याकडे विध्वंसक असे क्षेपणास्त्र आहेत. ही बाब लपून राहिली नाही. कधी व केंव्हा घात करेल हे सांगता येवू शकत नाही. त्यामुळे भारताने सावध भुमिका घेतली आहे. आता अमेरिकेला पाकिस्तानी रंग कळाला आहे. यावरून वेळीच सावध होणे अपेक्षित आहे. नसता वर्ल्ड टावर उद्धस्थ केले. केवळ लादेन याला ठार मारले बाकी पाकिस्तानचे अमेरिकेने काहीच वाकडे केले नाही. पाकिस्तानला एक घमंड आहे की, आमचे काही गैर करू शकत नाही. एकतर जागतिक स्तरावर मोठी त्यांच्या समाजाची संख्या आहे. एकमेकाला ते मदत करतात. अशा स्थितीत अमेरिकेने जर पाकिस्ताला धमकावले तरच पाकिस्तान क्षेपणास्त्राची निर्मिती बंद करेल नसता एक ना एक दिवस अमेरिकेला पाकिस्तान हात दाखविल्याशिवाय राहाणार नाही. आज जरी लहान देश समजला जात असला तरी विध्वंसक वृत्ती अंगी मोठी आहे. भारताला शह देण्यासाठी चीन जरी पाकिस्तानला मदत करीत असला तरी उद्या चीनला देखिल पाकिस्तान हा हात दाखवु शकतो. यामुळे वेळीच महासत्तावादी अमेरिकेने सावध झाले पाहिजे. त्याचा जो क्षेपनास्त्राचा कार्यक्रम जप्त केला पाहिजे, तरच जगात शांती लाभणार आहे.

# नाश्ता करताना 'या' सहा चुकांमुळे वाढू शकतो लठ्ठपणा



सकाळचा नाश्ता हा दिवसातील सर्वात महत्वाचा आहार आहे. अशा वेळी पौष्टिक काही खाल्ल्यास आरोग्य सुधारतं, पण नाश्ता नीट न केल्यास आरोग्याला हानी पोहोचतेच आणि वजनही वाढू शकतं. अनेक वेळा वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असतानाच लोक नाश्ता करताना अशा चुका करतात ज्यामुळे लठ्ठपणा झपाट्याने वाढतो. नाश्ता करताना कोणत्या चुका करू नये हे जाणून घेऊया...

'या' चुकांमुळे वाढतं वजन

नाश्त्यामध्ये पोषक तत्वांचा अभाव :- प्रोटीनयुक्त नाश्ता केवळ वजन कमी करण्यातच नाही तर वजन मॅनेज करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. अशा वेळी जर प्रोटीनचा नाश्त्यामध्ये समावेश केला नाही तर पुन्हा थोड्याच वेळात भूक लागते, ज्यामुळे नंतर जास्त प्रमाणात खाल्लं जातं. प्रोटीन व्यतिरिक्त नाश्त्यामध्ये फायबर, मिनरल्स आणि व्हिटॅमिन्सचा समावेश करणं देखील खूप महत्वाचं आहे.

गरजेपेक्षा जास्त सुपरफूड खाणं:- असे अनेक पदार्थ आहेत जे भरपूर पोषक असतात आणि म्हणूनच त्यांना सुपरफूड म्हणतात. परंतु, कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट असतो आणि म्हणूनच हे सुपरफूड मर्यादित प्रमाणातच सेवन करणं महत्त्वाचं आहे. या सुपरफूडमध्ये फ्लेक्स सीड्स, सफरचंद, ओट्स, बटर यांचा समावेश होतो.

योग्य प्रमाणात न खाणं:- असे अनेक खाद्यपदार्थ आहेत जे आरोग्यदायी असतात पण जर ते योग्य प्रमाणात खाल्ले गेले नाहीत तर त्यांचा प्रभाव निम्म्यावर येतो. ओट्सचंच उदाहरण घेतलं तर नाश्त्यात जास्त प्रमाणात सेवन केल्यास वजन कमी होण्याऐवजी वाढू शकतं.

नाश्ता न करणं:- अनेकांना असं वाटतं की, जर त्यांनी रात्री खूप खाल्लं असेल तर दुसऱ्या दिवशी नाश्ता न केल्याने त्यांचं वजन कमी होऊ शकतं. पण, नाश्ता वगळण्याऐवजी योग्य प्रमाणात नाश्ता करणं महत्त्वाचं आहे. सामान्य दिवसातही नाश्ता न केल्यामुळे वजन कमी होत नाही उलट वजन वाढतं आणि लठ्ठपणा वाढतो.

नाश्त्यामध्ये योग्य गोष्टींचा समावेश न करणं:- तुम्ही जर बाजारात विकली जाणारी बिस्किटं, ब्रेकफास्ट बार किंवा ब्रेकफास्ट ड्रिंक्सचं सेवन करत असाल तर त्याचा तुमच्या वजनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. कारण या पदार्थांमध्ये रिफाईंड शुगर असते ज्यामुळे वजन वाढतं.

योग्य वेळी नाश्ता न करणं:- नाश्त्याच्या वेळेकडे लक्ष देणं आवश्यक आहे. साधारणपणे सकाळी ७ ते ९ ही वेळ नाश्त्यासाठी योग्य मानली जाते. सकाळी ९ वाजल्यानंतर नाश्ता केला तर त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

# पिवळीच नाही तर लाल केळी खाल्ल्याने अनेक आरोग्यदायी फायदे होतात, जाणून घ्या



केळी हे एक फळ आहे जे त्याच्या गोडपणासाठी आणि भरपूर पौष्टिकतेसाठी ओळखले जाते. पिवळी केळी आपण सगळेच खातो, पण लाल केळीही तितकीच चविष्ट आणि आरोग्यासाठी फायदेशीर आहे हे तुम्हाला माहीत आहे का? लाल केळी पिवळ्या केळीपेक्षा गोड आणि अधिक पौष्टिक असतात. त्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे मोठ्या प्रमाणात असतात. चला जाणून घेऊया लाल केळी खाण्याचे काही प्रमुख फायदे:

१. अँटिऑक्सिडंट्सचा खजिना: लाल केळ्यामध्ये अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते. हे अँटिऑक्सिडंट्स शरीराला मुक्त रॅडिकल्सपासून वाचवतात आणि अनेक आजारांपासून बचाव करण्यास मदत करतात. लाल केळ्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट हृदयरोग, कर्करोग आणि डोळ्यांचे आजार रोखण्यासाठी उपयुक्त आहेत.

२. पचन सुधारते: लाल केळ्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. हे फायबर पचन सुधारते, बद्धकोष्ठतेपासून आराम देते आणि आतडे निरोगी ठेवते. लाल केळ्यामध्ये असलेले फायबर पोट दीर्घकाळ भरलेले ठेवते, ज्यामुळे पुन्हा पुन्हा खाण्याची इच्छा कमी होते.

३. रक्तदाब नियंत्रित करते: लाल केळ्यामध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. हे रक्तवाहिन्या रुंद करण्यासाठी उपयुक्त आहे, ज्यामुळे रक्त प्रवाह सुधारतो आणि रक्तदाब कमी होतो.

४. हाडे मजबूत करते: लाल केळ्यामध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी जास्त प्रमाणात असते. हे पोषक घटक हाडे मजबूत करण्यास मदत करतात आणि ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजारांना प्रतिबंध करण्यास मदत करतात.

५. निमियापासून बचाव: लाल केळ्यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असते. लोह अशक्तपणा टाळण्यासाठी मदत करते. अशक्तपणा म्हणजे शरीरात लाल रक्तपेशींची कमतरता, ज्यामुळे थकवा, अशक्तपणा आणि श्वासोच्छवासाचा त्रास होतो.

लाल केळीचे फायदे- आहारात लाल केळीचा समावेश कसा करावा? तुम्ही लाल केळी थेट खाऊ शकता. तुम्ही ते स्मूदी, सॅलड किंवा दहीमध्ये घालू शकता. तुम्ही ते बेकिंगमध्ये देखील वापरू शकता.

टीप:- लाल केळ्यामध्ये फ्रक्टोजचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे ते कमी प्रमाणात सेवन करावे. जर तुम्ही कोणत्याही आजाराने त्रस्त असाल तर लाल केळीचे सेवन सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. लाल केळी हे एक स्वादिष्ट आणि पौष्टिक फळ आहे जे आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. याचे माफक प्रमाणात सेवन केल्याने तुम्ही तुमचे आरोग्य सुधारू शकता. त्यामुळे आजच तुमच्या आहारात लाल केळ्याचा समावेश करा आणि त्याची चव आणि आरोग्यदायी फायद्यांचा आनंद घ्या.

# चुकूनही चहामध्ये टाकू नका हे तीन पदार्थ, अन्यथा चहा करेल विषाचे काम



चहा असे पेय आहे ज्या शिवाय दिवसाची सुरुवात होत नाही. सकाळी उठल्याबरोबर सकाळचा एक कप चहा घेतला तरच सकाळी फ्रेश वाटते. असे अनेक जण सांगतात. घरी कोणी पाहुणे आले तर सर्वप्रथम त्यांना चहा देतो. जर तुम्हाला मित्रांसोबत गप्पा टप्पा करायच्या असतील तर तुम्ही चहाच्या स्टॉलवर जाऊन गरमागरम चहा पितात. पण तुम्हाला माहिती आहे का की जर आपण चहा मध्ये तीन गोष्टी मिसळून चहा पिला तर हा चहा विषारी होऊ शकतो. आयुर्वेदात या तीन गोष्टी चहाच्या विरोधात मानल्या जातात आणि चहा मध्ये टाकून पिल्यास एक दोन नव्हे तर तब्बल दहा प्रकारचे आजार होऊ शकतात.

चहामध्ये चुकूनही टाकू नका या तीन गोष्टी डॉ. रॉबिन शर्मा यांनी नुकतेच इंस्टाग्राम वर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे या व्हिडिओमध्ये त्यांनी चहामध्ये कोणत्या गोष्टी टाकू नयेत आणि तुम्ही अश्या प्रकारे बनवलेला चहा तुमच्या शत्रूंना द्यावा हे सांगितले आहे.

डॉ. रॉबिन यांनी सांगितले आहे की, दूध आणि साखर घालून केलेला चहा हा आरोग्यासाठी हानिकारक असतो. त्यामुळे दूध आणि साखरेचा चहा कधीही पिऊ नये. एवढेच नाही तर काही लोक चहा मध्ये साखरे ऐवजी गुळाचा वापर करतात. पण चहा मध्ये गूळ घातल्याने पचनाचा धोका वाढतो आणि मधुमेहही वाढतो त्यामुळे चहा मध्ये या तीन गोष्टी कधीही टाकू नयेत.

चहा सोबत हे पदार्थ खाणे टाळा

आयुर्वेदानुसार चहा सोबत काही खाद्यपदार्थ खाणे देखील विषाचे काम करतात. डॉक्टर रॉबिन यांच्या मते चहा सोबत समोसे, भजे, नमकीन पदार्थ कधीही खाऊ नये. याशिवाय काही जणांना चहा सोबत पराठा खाण्याची सवय असते तर चहा सोबत पराठा देखील खाऊ नये विशेषतः पॅकिंगच्या पिठापासून बनवलेली पोळी किंवा पराठ्यामुळे आजार होऊ शकतात.

बहुतेक लोक दूध, केळी, गूळ आणि हरभरा यांचा शेक बनवतात आणि तो पितात जो प्रोटीनने समृद्ध आहे असे मानले जाते. मात्र हा शेक पोटात गेल्यानंतर अनेक रोगांचा धोका वाढू शकतो. या रोगांमध्ये टाईप १ मधुमेह, संधिवात, सोरायटिक संधिवात, मल्टिपल स्क्लेरोसिस, दाहक आतडी रोग, ग्रेव्हस रोग, मायस्थेनिया ग्रॅव्हिस, सेलिआक रोग, अपायकारक अशक्तपणा यासारख्या रोगांचा समावेश होतो.




हिवाळ्याच्या दिवसांत तब्येतीशी संबंधित समस्या वाढू लागतात. लोकांच्या शरीरात वेदना जाणवतात तर काही लोकांना सर्दी, खोकल्याची समस्या उद्भवते . अशा स्थितीत मेथीचे लाडू खाल्ल्यानं शरीराला एनर्जी मिळते आणि शरीराची गरमी टिकून राहते ज्यामुळे सर्दी, खोकल्याची समस्या उद्भवत नाही. याशिवाय हे लाडू केसांसाठीही बरेच फायदेशीर ठरतात. मेथी आणि डिंकाचे लाडू कसे करायचे त्याची सोपी रेसिपी पाहूया.

मेथी आणि लिंकाचे लाडू उत्तर भारतातील एक लोकप्रिय पदार्थ आहेत. कारण थंडीचे वातावरण तिथे नेहमीच असते म्हणून हे लाडू बनवले जातात. महाराष्ट्रातही थंडीच्या दिवसांत आवर्जून हे लाडू केले जातात. मेथीच्या लाडूत अळीव, डिंक, काजू, बदाम, पिस्ता, खोबरं असे बरेच पौष्टीक पदार्थ घातले जातात.

मेथीचे लाडू करण्यासाठी लागणारं साहित्य :- १) मेथी- २ कप, २) डिंक- १ कप, ३) गव्हाचं पीठ- २ कप, ४) दळलेली साखर - १ कप, ५) वेलची पावडर - अर्धा चमचा, ६) सुका मेवा - अर्धी वाटी

मेथीच्या लाडूची रेसिपी:- १) मेथीचे दाणे वाटून ही पावडर हलक्या आचेवर भाजून घ्या. डिंक फुलेपर्यंत नीट भाजून घ्या मग थंड होऊ द्या. डिंक बारीक करून त्याची पावडर बनवून घ्या.

२) गव्हाचं भाजलेलं पीठ आणि साखर व्यवस्थित मिसळा. नंतर यात तूप आणि साखर घालून मिसळून घ्या. वेलची पावडर आणि बारीक केलेला सुका मेवा घाला. तुम्ही साखरेऐवजी गुळाचा वापर करू शकता. फक्त चिक्कीचा गूळ वापरू नका. ३) त्यात नारळाचं तेल, सुके मेवे हे मिसळा आणि मिश्रण गरम असतानाच छोटे छोटे लाडू वळून घ्या. हे लाडू एका बंद डब्यात घालून स्टोअर करा.

मेथी आणि डिंकाचे लाडू खाण्याचे फायदे:- मेथीचे लाडू तब्येतीसाठी बरेच पौष्टीक असतात. यात फायबर्स, प्रोटीन्स यांसारखी खनिजं असतात. याव्यतिरिक्त हे लाडू खाल्ल्यानं केसांची वाढ चांगली होते. शरीराला प्रोटीन मिळते. यामुळे मसल्स बिल्डींगसाठी फायदा होतो. याव्यतिरिक्त सर्दी, खोकल्यापासूनही आराम मिळतो.



## वाटीभर मेथी दाण्यांचे करा पौष्टीक लाडू, कडू अजिबात होणार नाही; हिवाळ्यात दुखण्यांपासून राहाल लांब

हिवाळ्यात पौष्टीक लाडू खाल्ले जातात. यामुळे गंभीर आजारांचा धोका कमी होतो. विविध प्रकारचे लाडू खाल्ल्याने शरीरातील विविध अवयवांना याचा फायदा होतो. पौष्टीक लाडूमध्ये मेथी दाण्यांचाही समावेश आहे. संपूर्ण भारतात मेथी दाण्यांचे सेवन केले जाते. मेथी शरीरासाठी खूपच फायदेशीर असते. यामध्ये अनेक पोषक तत्व आढळतात. यात सोडियम, पोटॅशियम, फायबर, लोह, कॅल्शियम, व्हिटॅमिन डी आणि व्हिटॅमिन सी आढळते. ज्यामुळे वजन कमी, केसांच्या निगडीत समस्या यासह त्वाचेला तजेलदार करण्याचं काम मेथी दाणे करतात.

मेथी दाणे सहसा खाण्यास लोक टाळतात. त्यामुळे आपण मेथी दाण्याचे पौष्टीक लाडू खाऊ शकता. जे लोक मेथी दाणे खाताना नखरे करत असतील त्यांना मेथी दाण्याचे लाडू खायला द्या. जर आपल्याला मेथी दाण्याचे लाडू करायला जमत नसेल तर, प्रमाण चुकत असेल तर, या रेसिपीला फॉलो करून पाहा. झटपट मेथी दाण्याचे पौष्टीक लाडू तयार होतील .

मेथी दाण्याचे पौष्टीक लाडू करण्यासाठी लागणारं साहित्य:- मेथी दाणे,तूप, खजूर, सुकं खोबरं,डिंक, गव्हाचं पीठ, गुळ, खसखस, ड्रायफ्रुट्स

कृती:- सर्वात आधी गॅसवर भांडं गरम करण्यासाठी ठेवा. नंतर त्यात ३० ग्रॅम मेथी दाणे घालून भाजून घ्या. मेथी दाणे भाजून घेतल्यानंतर मिक्सरच्या भांड्यात काढून घ्या. त्याची पावडर तयार करा. त्यात ५० ग्रॅम तूप घाला. आणि चमच्याने मिक्स करा. आणि २ दिवस त्यावर झाकण ठेवून भिजत ठेवा.

नंतर कढईमध्ये १ मोठा चमचा तूप घाला. त्यात २५० ग्रॅम बिया काढलेले खजूर घालून भाजून घ्या. भाजलेले खजूर एका प्लेटमध्ये काढून घ्या. नंतर त्यात सुकं किसलेलं खोबरं घालून भाजून घ्या. हवं असल्यास आपण त्यात तूप घालू शकता. भाजलेलं किसलेलं सुकं खोबरं एका परातीत काढून घ्या.

नंतर कढईमध्ये ३ मोठे चमचे तूप घाला. तूप गरम झाल्यानंतर त्यात ५० ग्रॅम डिंक घाला. फ्राय केलेले डिंक एका प्लेटमध्ये काढून घ्या. कढईत पुन्हा ३ मोठे चमचे तूप घाला. आणि १५० ग्रॅम गव्हाचं पीठ घालून भाजून घ्या. भाजलेलं गव्हाचं पीठ परातीत काढून घ्या. नंतर त्यात २ मोठे चमचे खसखस, ड्रायफ्रुट्स घालून भाजून घ्या. मग गुळ घाला. गुळ विरघळल्यानंतर त्यात भिजलेल्या मेथी दाण्याची पावडर घालून मिक्स करा. आणि परातीत काढून घ्या.

नंतर मिक्सरच्या भांड्यात भाजलेले खजूर घालून बारीक पावडर तयार करा. आणि परातीत काढून घ्या. सर्व मिश्रण चमच्याने मिक्स करा. हाताला थोडे तूप लावा, आणि थोडे मिश्रण घेऊन लाडू वळवून घ्या. अशा प्रकारे मेथी दाण्याचे पौष्टीक लाडू खाण्यासाठी रेडी.

# युद्धाचे ढग काही विरेनात

इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धबंदी झाली. मात्र ती काही तासच टिकली. अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी रशिया-युक्रेनमध्ये युद्ध होणार नाही, असे जाहीर केले; प्रत्यक्षात मात्र रशियाने युक्रेनवर मोठा हल्ला केला. दोन-तीन वर्षे असे युद्ध चालू राहते आणि त्याचे परिणाम जगाला भोगावे लागतात. आणखी किती काळ जगाने युद्धाच्या झळा सहन करायच्या, हा प्रश्नच आहे.

लेबनॉन आणि इस्रायलमध्ये दीर्घकाळ चाललेल्या तणावानंतर अखेर युद्धविराम झाला. लेबनीज सरकारने या कराराला मान्यता दिली आणि त्याला 'हिजबुल्लाह'सह सर्व लेबनीज गटांची संमती मिळाली. इस्रायलच्या मंत्रिमंडळानेही २६ नोव्हेंबर रोजी या युद्धविरामाला मंजुरी दिली आणि २७ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजल्यापासून दोन्ही देशांमधील संघर्ष थांबला; पण युद्धबंदीच्या २४ तासांमध्ये इस्रायल आणि लेबनॉनमधील तणाव पुन्हा वाढला. इस्रायलने २८ नोव्हेंबर रोजी दक्षिण लेबनॉनमध्ये 'हिजबुल्लाह'ने वापरलेल्या लाँचरवर हवाई हल्ला केला. इस्रायलकडून या हल्ल्यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. दक्षिण लेबनॉनच्या काही भागात परतण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांवर गोळीबार केल्याचे इस्रायली लष्कराने सांगितले. इस्रायलचे म्हणणे आहे की हे लोक युद्धविराम कराराचे उल्लंघन करत होते; २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम लागू झाला. यानंतर लेबनीज आर्मीवर अनेकदा युद्धविराम तोडल्याचा आरोप करण्यात आला. युद्धबंदी किती नाजूक आहे, हे या आरोप-प्रत्यारोपांवरून स्पष्ट होते. युद्धबंदीच्या अटींनुसार, इस्रायली सैन्याला दक्षिण लेबनॉनमधून माघार घेण्यासाठी साठ दिवस लागतील; परंतु या कालावधीत कोणतीही बाजू आक्रमक कारवाई करणार नाही. लेबनॉनमधून रॉकेट हल्ल्यांमुळे उत्तर इस्रायलमधील लोक विस्थापित झाल्यामुळे बेंजामिन नेतन्याहू यांनी 'हिजबुल्लाह'विरुद्ध ही कारवाई केली. तथापि, उत्तर इस्रायलमधील सुमारे साठ हजार लोक अजूनही आपल्या घरी परत येऊ शकलेले नाहीत. इस्रायलच्या म्हणण्यानुसार 'हिजबुल्लाह'ने कराराचे पालन केले तरच ते आपले सैन्य मागे घेतील. नेतन्याहू यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, आपण युद्धविरामाचे उल्लंघन केले, तर पुढील कारवाईसाठी तयार राहण्याचे आदेश दिले आहेत.

युद्धबंदीनंतर दोन्ही देशांमधील हिंसाचाराची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. लेबनॉनने ऑक्टोबर २०२३ मध्ये हिंसाचार सुरू केला. हमासने गाझामधून हल्ला केल्यानंतर 'हिजबुल्लाह'ने इस्रायलवर रॉकेट, ड्रोन आणि मिसाईल डागण्यास सुरुवात केली. इस्रायलने हवाई हल्ले करून प्रत्युत्तर दिले आणि नंतर सप्टेंबरच्या मध्यात युद्ध मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. गाझामधील युद्ध अजूनही सुरू आहे आणि त्याचा शेवट दृष्टिपथात नाही. लेबनीज आरोग्य अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, इस्रायली गोळीबारात लेबनॉनमध्ये तीन हजार ७६०हून अधिक लोक मारले गेले. या लढाईमध्ये इस्रायलमधील सत्तरहून अधिक लोक मारले गेले. त्यापैकी अर्ध्याहून अधिक नागरिक होते, तसेच दक्षिण लेबनॉनमध्ये लढणारे डझनभर इस्रायली सैनिक होते. नेतन्याहू यांनी युद्धबंदीची तीन कारणे दिली आहेत. इराणवर लक्ष केंद्रित करणे, इस्रायली सैन्याला श्र्वास घेण्यास आणि साठा भरून काढण्यासाठी वेळ देणे आणि हमास-हिजबुल्लाहला वेगळे करणे. संयुक्त राष्ट्राने इस्रायलच्या हल्ल्यांना नरसंहार म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने इस्रायलला ताब्यात घेतलेल्या प्रदेशातून माघार घेण्याचे आवाहन केले आहे आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने नेतन्याहूविरुद्ध अटक वॉरंट जारी केले आहे; मात्र असे असतानाही इस्रायलने गाझामध्ये आपल्या कारवाया सुरूच ठेवल्या आहेत.

लेबनॉनसाठी ताज्या युद्धबंदीला मोठे महत्त्व होते. युद्ध सुरू होण्यापूर्वीच लेबनॉनची अर्थव्यवस्था खूपच कमकुवत होती. आता अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे या देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक संकटात आणखी वाढ झाली. शिवाय, युद्धाने लेबनॉनमध्ये सांप्रदायिक तणाव पुन्हा जागृत केला आहे. लेबनॉनमध्ये विविध गटांमध्ये तणाव, संघर्षाची परिस्थिती आहे. इस्रायलच्या हल्ल्यापूर्वी लेबनॉनमधील कोणताही गट 'हिजबुल्लाह'ला आव्हान देण्याच्या स्थितीत नव्हता; पण आता परिस्थिती बदलली आहे. 'हिजबुल्लाह'ची लष्करी शक्ती कमकुवत झाली असून त्याचा नेता नसराल्लाह मारला गेला आहे. लेबनॉनमध्ये दोन वर्षांपासून अध्यक्ष नाही. नवीन राष्ट्रपतींची नियुक्ती त्यांच्या मित्रपक्ष असण्याच्या अटीवर केली होती. आता लेबनॉनच्या नेत्यांनी नवीन अध्यक्षांच्या नावावर सहमती दर्शवली पाहिजे, जो नवीन पंतप्रधान आणि सरकार नियुक्त करेल. दरम्यान, रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाने नवे वळण घेतले. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी युक्रेनच्या मित्रराष्ट्रांना एक इशारा दिला आहे. यामुळे युरोपपासून इंग्लंडपर्यंत मोठ्या प्रमाणावर विनाश होऊ शकतो. हे देश पुतीन यांचे लक्ष्य आहेत. युक्रेनला आण्विक शस्त्रे परत करण्याचा निर्णय घेण्यात आला असताना पुतीन यांनी हा इशारा दिला आहे. या पावलामुळे जागतिक सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, असा दावा रशियाने केला. युक्रेनला अण्वस्त्रे मिळाल्यास त्याचे प्रत्युत्तर अत्यंत विनाशकारी असेल, असे रशियाने स्पष्ट केले आहे. पुतीन यांच्या योजनेनुसार, लंडन, बर्लिन, पॅरिस आणि रोम यासारख्या युरोपियन राजधान्यांवर हल्ले केले जातील. स्वीडन, फिनलंड, पोलंड आणि नेदरलँड यांसारख्या देशांवरही भयंकर हल्ल्यांची योजना आखण्यात आली. पुतीन यांनी पारंपरिक अण्वस्त्रांच्या पलीकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या शस्त्रांचा उल्लेख केला आहे, ज्यात हायपरसोनिक क्षेपणास्त्रे, गुप्त लढाऊ विमाने, लांब



पल्ल्याचे ड्रोन, थर्मल रेडिएशन शस्त्रे यांचा समावेश आहे.

पुतीन यांचा इशारा हलक्यात घेतला जात नाही. हा इशारा युरोपच नव्हे, तर अमेरिका आणि इतर मित्र राष्ट्रांसाठीही गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. रशियाची ही आक्रमक भूमिका संपूर्ण जगाला विनाशाकडे ढकलू शकते. पुतीन यांच्या इशाऱ्यानंतर 'नाटो' देशांमध्ये घबराट पसरली आहे. अमेरिकेने युद्धक्षेत्रात 'मिनिटमॅन-३' क्षेपणास्त्र सक्रिय केले आहे. जर्मनी आणि पोलंडमध्ये संरक्षण यंत्रणा कार्यान्वित होत आहेत. अमेरिकेने आपली अण्वस्त्रे अपग्रेड करण्यासाठी १३८ अब्ज डॉलर (११ लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त बजेट मंजूर केले आहे. अलीकडेच रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला करून त्या देशाचा वीजपुरवठा खंडित केला. या हल्ल्यांमध्ये रशियाने ९१ क्षेपणास्त्रे आणि ९७ ड्रोन्सचा वापर केला. युक्रेनच्या ऊर्जा क्षेत्राच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करणाऱ्या या हल्ल्यानंतर दहा लाखांहून अधिक लोकांना अंधारात राहणे भाग पडले. रशियाने या हल्ल्याचे वर्णन युक्रेनने अमेरिकन 'एटीएसीएमएस' क्षेपणास्त्रांच्या वापरास प्रत्युत्तर म्हणून केले आहे. ही बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे लांब पल्ल्याच्या हल्ल्यासाठी सक्षम आहेत. अलीकडेच युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ला करण्यासाठी त्यांचा वापर केला होता. पुतीन यांनी या हल्ल्यांना 'पाश्र्चात्य शस्त्रांचा धोकादायक वापर' म्हटले आणि रशिया जोरदार प्रत्युत्तर देईल असे सांगितले.हल्ल्यापूर्वी पुतीन यांनी कझाकस्तानची राजधानी अस्ताना येथे पत्रकार परिषदेत सांगितले, की रशिया युक्रेनच्या 'निर्णय केंद्रांवर' आणि कीव्हवर नवीन हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांचा वापर करण्याचा विचार करू शकतो. रशियाने युक्रेनचे ऊर्जा ग्रीड आणि इंधन साठवण सुविधांवर हल्ला केल्यानंतर काही तासांमध्येच ही धमकी आली आहे. रशियन हल्ल्यांनंतर युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी 'नाटो'चे सरचिटणीस, ब्रिटिश पंतप्रधान स्टार्मर आणि जर्मन चान्सलर ओलाफ स्कोल्झ यांच्यासह अनेक पाश्र्चात्य नेत्यांना मदतीचे आवाहन केले. आमच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर हा केवळ युक्रेनवरील हल्ला नाही तर संपूर्ण जगाच्या शांतता प्रयत्नांवर आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये जवळपास तीन वर्षांपासून सुरू असलेल्या युद्धाचे रूपांतर आता नव्या आणि घातक शस्त्रांच्या शर्यतीत झाले आहे. युक्रेन पाश्र्चात्य शस्त्रांचा वापर करत असल्याचा दावा रशियाने केला आहे.

## योगा करताना कोणते कपडे घालावेत



योगामुळे केवळ तंदुरुस्तीच नाही तर मनाला शांती देखील मिळते. आणि जी ह्या धावपळीच्या जगात खूप महत्वाची आहे. योगा हा शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पद्धतींचा एक समूह आहे, जो भारताचा मूळ असून कित्येक दशकांपासून केला जात आहे. आपल्या श्वासोच्छवासाचे निरीक्षण करण्यासह ध्यान आणि आराम करणारी हि कला संपूर्ण शरीर आणि मनाची कसरत करते. आपल्या पंतप्रधानांपासून ते बॉलीवूड आणि आंतरराष्ट्रीय सेलिब्रिटी पर्यंत योगाचे अनुसरण करताना पाहायला मिळते. योगा करताना गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. योगा करण्यासाठी एक चटई (मॅट), हायड्रेटेड राहण्यासाठी पाण्याचा बाटली, एक टॉवेल (घाम टिपण्यासाठी) आणि योग्य आऊटफिट! कमजोर फॅब्रिक असेल तर आसन करताना फाटण्याची शक्यता जास्त असते, त्यामुळे योग्य आऊटफिट निवडणे तितकेच महत्वाचे आहे. बॉलीवुड सेलिब्रिटीज योगाचे मोठे चाहते आहेत, आपण आसन करताना दिवा म्हणून फॅशनेबल दिसावे यासाठी ते नेहमीच काळजी घेतात! स्पायकर लाइफस्टाइलचे डिझाइन हेड श्री. अभिषेक यादव आणि श्री. नेल्सन जाफरी, हेड ऑफ डिझाईन लीवा यांनी सेलिब्रटीजकडून माहिती घेत योगा करण्यासाठी ५ योग्य आऊटफिटची माहिती सांगितली आहे.स्लिम जॉगर्स: हि आधुनिक जॉगर्स ट्रॅक पॅन्ट असून आरामदायक तितकीच सुपर- ट्रेंडी सुद्धा आहे. फॅब्रिक आरामदायक आणि मुलायम तर आहेच शिवाय तुमच्या शरीराला चिकटून राहत नाही, त्यामुळे योगा करताना अडचण येत नाही.

बॅगी क्रॉप टॉप: हा असा महिलांचा फॅशन ट्रेंड आहे जो कधीं जुना होत नाही. १९७० च्या दशकापासून क्रॉप टॉप फॅशनमध्ये आहेत. मुख्यतः वाढत्या फिटनेस जागरूकतेमुळे क्रॉप टॉप्स आता फॅशन घटक बनले आहे. हे उत्कृष्ट दर्जाचे आरामदायक आणि स्टाइलिश लुक देतात. याचे फॅब्रिक व्हिस्कोस आणि कॉटन सारख्या आरामदायक कापडांपासून बनविलेले असते.

ऋथ्च् गछड: विशेषतः खेळाच्या दृष्टीने बनवलेली हि जिम जीन्स आहे, ही डेनिम लवचिक असल्याने योगा करण्यासाठी सुद्धा उत्तम आहे. एक नाविन्यपूर्ण सूक्ष्म तंत्रज्ञान वापरून याचे फॅब्रिक बनवले आहे, जे लवकर वाळते. त्यामुळे कितीही घाम आले तरी लगेचच कपडे सुकू शकतात.

लेगिंग / योगा पॅन्ट्स: नावाप्रमाणेच योगा करण्यासाठी योग्य पॅंट्स आहे. व्हिस्कोस सारख्या कपड्यांपासून बनवलेले असून ते फक्त मुलायम किंवा आरामदायीच नसून तुमच्या स्किनला अगदी योग्यरीत्या शोभून दिसतात. घाम लगेचच सुकण्यास मदत करते. त्यामुळे अंगाला चिकटपणा जाणवत नाही. हि सर्वोत्तम योगा पॅंट्स आहे.

## डॉक्टर टीप्स

### पुरुषांनी चुकून खाऊ नये हे ५ पदार्थ, शारीरिक कमतरता जाणवू शकते



बदलत असलेली जीवनशैलीचा प्रभाव दांपत्य जीवनावर पडत आहे. हल्ली ताणावाच प्रभाव मॅरिड लाईफवर पडत असून अनेक दंपती बाळाला जन्म घालण्यास समर्थ ठरतं आहे. खानपान, राहणी आणि धावपळीच्या या काळात पुरुषांमध्ये नपुंसकत्व वाढत आहे. योग्य आहार आणि पोषणाची कमी या कारणामुळे पुरुषांची प्रजनन क्षमता प्रभावित होत आहे. अशात कमजोरीमुळे दांपत्य जीवनातील आनंद देखील हरवत आहे. तर आज जाणून घ्या नपुंसकत्वासाठी जवाबदार

**५ खाद्य पदार्थांबद्दल:**

**१. कॅफीन-चहा**-कॉफीची सवय महागात पडू शकते. आपल्याला बहुतेकच माहीत असेल की चहा--कॉफीची प्रत्येक घुट आपल्या सेक्शुअल हेल्थसाठी धोकादायक आहे. दिवसातून दोन कपाहून अधिक चहा-कॉफी पुरुषांच्या प्रजनन सेल्सचे आरोग्य बिघडवते. म्हणून नुकसानापासून बचावासाठी दिवसातून दोन कपाहून अधिक पिणे टाळावे. तसेच रिकाम्या पोटी चहा-कॉफी घेणे ही टाळावे.

## विनोद




सतीश : 'तुझा मुलगा काय करतो?'
अजीत : 'कॉलेजात आहे.'
सतीश : 'त्याचा अभ्यास कसा चालला आहे.'
अजीत : 'चांगला चालला आहे.'
सतीश : 'कॉलेज आवडलं का त्याला?'
अजीत : 'खूपच आवडलंय. एकेका वर्गात तो दोन दोन वर्ष काढतो.'

## संदेश

Bhagwan Ki Tabyat Kharab Hai
Bacha Khel Ker Ghar Aya To Maa Se Pucha:
"Maa, Kiya Bhagwan Ki Tabyat Kharab Hai?"
Maa: Tumhen Kis Ny Kaha??
Bacha: Bahar Log Keh Rahy Thy K Shehr K Bary Doctor Ko Bhagwan Ny Apny Pass Bula Liya Ha.

## सुविचार




ज्याची कसलीही मागणी नसते तो सम्राट असतो.

**– महर्षि कणाद**

**संस्कृत सुभाषित**

दीर्घोद्योगाने, दृढनिश्चयाने व ईश्वरी कृपेने सत्वर कार्यसिद्धी होते.अनिर्वेदेन दीर्घेण निश्चयेन ध्रुवेण च देवदेवप्रसादाच्च क्षिप्रं फलम्वाप्यते ।।
(शांतीपर्व, अध्याय १५३, ोक ११७, महाभारत)
अर्थ –अर्थ – दीर्घोद्योगाने, दृढनिश्चयाने व ईश्वरी कृपेने सत्वर कार्यसिद्धी होते.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. डोंगरराजीतील साहसी पर्यटन
४. गुणज्ञ
८. वक्र
११. पानाचे दुकान
१२. अफूचे बी
१४. महिना
१५. पहारेकरी
१८. विपुलता
२०. हस्तेपरहस्ते
२२. जिवलग मैत्रिण
२३. निकट
२५. रडगाणे, रडकथा
२६. अरण्य
२८. वृक्ष
३०. होडी चालवणारा
३२. किल्ली
३४. घनिष्ठ संबंध
३६. समुद्राच्या लाटांचा आवाज
३८. दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे नियतकालिक
३९. '-- जनाब ने पुकारा नहीं, क्या मेरा साथ भी गंवारा नहीं'
४०. मीठ
४१. थोडेसे
४२. जन्मदाता
४३. हेतू, कारण, स्वार्थ
४५. रेती
४६. विष्णुपत्नीचे एक नाव
४८. वर्ष, साल
४९. लिंबूसाखरेचे थंड पेय
५२. अंगावर येणारा काटा
५४. पादत्राण
५५. गहन
५६. स्वर्गाचे दोन पहारेकरी
५८. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६०. घास पण गवत नव्हे
६१. एक चतुर्थांश
६२. व्रत, नेम
६४. उदर
६५. जयघोष
६७. अनुमती
६९. सुंभाबरोबर न जळणारा
७१. मोठा जाड अंगरखा
७२. तांब्या-पितळेची भांडी तयार करणारा
७४. '-- ---- म्हणतील हाय, हाय! मी जाता राहील कार्य काय?' (भा.रा.तांबे)
७७. गवंडी
७८. अचेतन शरीर
७९. पार्वतीचे उग्र रूप
८०. वशिला
८१. सोशिकपणा

### उभे शब्द


१. आस्था, फिकीर
२. तारणारा
३. आयुध
४. मद्य तयार करणारा-विकणारा
५. रुक्ष
६. सेवक
७. लचकत-मुरडत अशी चाल अथवा चालणारी
९. जास्तीतजास्त
१०. मच्छर
११. जपून ठेवलेली गोष्ट
१३. अखंड
१६. मोठे भांडण
१७. राममंदिरातील मारुतीचे रूप
१९. जीव, प्राण, चैतन्य
२०. चलनवलन
२१. अति खाण्यामुळे पोटाला बसणारी ओढ
२४. उगीच
२७. आवर घालणारी वादी
२९. शंभर पैशाचे नाणे
३१. प्रवाशांना घेऊन अधांतरी उडणारे
३३. डोंगरातील लांब गुहावजा जागा
३५. खुमारी
३७. उष्णतेमुळे पायाला भेगा पडण्याचा रोग
४१. आकाश
४२. पाण्याचा साठा असलेली जागा
४३. अंत:करण
४४. हावरटपणा
४७. इंद्रिय
४८. हुक्की, लहर
५०. मजबूत, भक्कम
५१. चरण
५३. राजसुख
५५. डोक्याला झालेली खोल जखम
५६. मनातली आग
५७. स्थानापन्न (होणे)
५९. उत्सवाचे दिवस
६१. चबुतरा
६३. भेग, चीर
६६. अंजन
६८. रविंद्रनाथ टागोरांचा काव्यसंग्रह
७०. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या आपण सगळेच
७१. नाजूक
७३. पत्र
७४. एक गळित धान्य
७५. वारा
७६. यज्ञ
७७. पौर्णिमा

### आडवे उत्तर

१.पर्वतारोहन ४.कदरदान ८.वाकडा ११.ठेला १२.खसखस १४.मास १५.रखवालदार १८.रेलचेल २०.हातोहात २२.सखी २३.लगत २५.रड २६.जंगल २८.तरू ३०.नाविक ३२.चावी ३४.सलगी ३६.गाज ३८.पाक्षिक ३९.माना ४०.लवण ४१.अंमळ ४२.जनक ४३.मतलब ४५.वाळू ४६.कमला ४८.सन ४९.सरबत ५२.शहारा ५४.वहाण ५५.खोल ५६.जयविजय ५८.कसकस ६०.कवळ ६१.पाव ६२.वसा ६४.पोट ६५.जयजयकार ६७.परवानगी ६९.पीळ ७१.कोट ७२.तांबट ७४.जन पळभार ७७.राज ७८.शव ७९.महाकाली ८०.लग्गा ८१.सहनशीलता

### उभे उत्तर

१.पर्वा २.तारणहार ३.हत्यार ४.कलाल ५.रखरखीत ६.दास ७.नखरेल ९.कमाल १०.डास ११.ठेवा १३.सलग १६.खडाजंगी १७.दास १९.चेतना २०.हालचाल २१.तडस २४.हकनाक २७.लगाम २९.रुपाया ३१.विमान ३३.विवर ३५.लज्जत ३७.जळवात ४१.अंबर ४२.जलाशय ४३.मन ४४.लसलस ४७.अवयव ४८.सणक ५०.बळकट ५१.पाय ५३.राणीव ५५.खोक ५६.जळजळ ५७.विराजमान ५९.सणवार ६१.पार ६३.सापट ६६.काजळ ६८.गीतांजली ७०.करदाता ७१.कोमल ७३.टपाल ७४.जवस ७५.पवन ७६.होम ७७.राका




# हे रिअल लाईफ प्रेम, गोविंद नामदेव यांनी ३९ वर्षांनी लहान अभिनेत्रीला डेट करण्याच्या चर्चांवर सोडलं मौन



डेटिंगच्या चर्चा असलेल्या अभिनेत्रीबरोबरचा फोटो शेअर करून गोविंद नामदेव यांनी प्रतिक्रिया दिली आहे. गोविंद नामदेव यांनी शिवांगी वर्माबरोबरचा फोटो पोस्ट केला आहे.

त्रैंळपव छरावर्शीं डहळींरपसळ तशीर : ज्येष्ठ अभिनेते गोविंद नामदेव यांनी चित्रपटांसह हिंदी मालिकांमध्ये काम करून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. त्यांनी करिअरमध्ये अनेकदा नकारात्मक भूमिका वठवल्या आहेत. सध्या ते त्यांच्या कामामुळे नाही तर वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहेत. मागील काही काळापासून ७० वर्षीय गोविंद नामदेव ३१ वर्षीय अभिनेत्री शिवांगी वर्माला डेट करत असल्याच्या चर्चा सुरू होत्या. आता त्यांनी याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.

शिवांगी वर्माने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला होता. ज्यामध्ये ती गोविंद यांच्याबरोबर पोज देत होती. या फोटोबरोबर तिने दिलेल्या कॅप्शनने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. प्यार की कोई उम्र नहीं होती, कोई सीमा नहीं होती असे कॅप्शन तिने दिले होते. त्यामुळे या दोघांबद्दल सोशल मीडियावर चर्चा रंगल्या. अखेर गोविंद नामदेव यांनी याबद्दल मौन सोडले आहे.

गोविंद यांनी शिवांगीबरोबरचा एक फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. त्याच्या कॅप्शनमध्ये त्यांनी या अफवांबाबत स्पष्टीकरण दिलं. त्यांनी पत्नी सुधाचादेखील उल्लेख केला. सुधा माझा श्र्वास आहे, असं ते म्हणाले.हे रिअल लाईफ प्रेम नाही, तर रील लाईफ आहे!गौरीशंकर गोहरगंज वाले नावाचा एक चित्रपट आहे.याच चित्रपटाचे शूटिंग आम्ही इंदूरमध्ये करत आहोत. यामध्ये एक वृद्ध व्यक्ती तरुण अभिनेत्रीच्या प्रेमात पडते.मी वैयक्तिकरित्या तरुण किंवा वृद्ध व्यक्तीच्या प्रेमात पडेन, असं या जन्मात तरी शक्य नाही.

माझी सुधा,

माझा श्र्वास आहे!

या जगातील सगळ्या गोष्टी तिच्यासमोर फिक्या आहेत, असं कॅप्शन लिहून त्यांनी शिवांगीबरोबर त्यांचं नाव जोडून अफवा पसरवल्या जात आहेत, त्यावर प्रतिक्रिया दिली.गोविंद नामदेव यांनी स्पष्ट केलंय की ते व शिवांगी डेट करत नाहीयेत. दोघेही एका चित्रपटात एकत्र काम करत आहेत, ज्यामध्ये त्यांच्या पात्रांचा रोमँटिक अँगल आहे. याचा दोघांच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंध नाही.

गोविंद नामदेव हे लोकप्रिय अभिनेते आहेत. त्यांनी 'ओएमजी', 'ओह माय गॉड २', 'बँडिट क्वीन', 'सत्या' आणि 'सिंघम' सारख्या अनेक चित्रपटांमध्ये विविधांगी भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटांव्यतिरिक्त त्यांनी अनेक मालिकांमध्येही काम केलं आहे.


# सलमान खानच्या शोमुळे लोकप्रिय झाली; ही बॉलीवूडची नवीन अभिनेत्री



सलमान खानच्या शोमुळे लोकप्रियता, बॉलीवूडसह साऊथ इंडस्ट्रीत काम; आता मराठीत पदार्पण करतेय 'ही' अभिनेत्री, म्हणाली...एकीकडे मराठी चित्रपट देशविदेशातील चित्रपट महोत्सवांमध्ये बाजी मारत आहेत, तर दुसरीकडे बॉक्स ऑफिसवर सुद्धा अनेक मराठी चित्रपटांनी गेल्या काही दिवसांत चांगली कामगिरी केल्याचं पाहायला मिळालं आहे. मराठी चित्रपटाचं कथानक, वैविध्यपूर्णता या गोष्टी प्रेक्षकांना विशेष भावतात आणि आता याची भुरळ अन्य इंडस्ट्रीमधल्या कलाकारांना सुद्धा पडतेय. सलमान खानच्या शोमधून घराघरांत लोकप्रिय झालेली एक अभिनेत्री आता लवकरच मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार आहे.हिंदी 'बिग बॉस'च्या सातव्या सीझनमध्ये सहभागी झालेली अभिनेत्री एली अवराम ( इेश्र- श्रुेव -लींशीी ) आता मराठी चित्रपटात झळकणार आहे. तिने अनेक बॉलीवूड चित्रपटांमध्ये देखील भूमिका साकारल्या आहेत. आता एली 'इलू इलू' या चित्रपटाद्वारे मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे.२०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मिकी व्हायरस' या चित्रपटाद्वारे एलीने हिंदी कलाविश्र्वात पदार्पण केलं होतं. तिने आतापर्यंत 'किस किस को प्यार करूं', 'नाम शबाना', 'पोस्टर बॉईज', 'बाझार', 'मलंग', 'कोई जाने ना', 'गुडबाय' या हिंदी चित्रपटांमध्ये काम केलंय. याशिवाय तमिळ आणि कन्नड चित्रपटांमध्येही तिने महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.

'इलू इलू' या मराठी चित्रपटात एली 'मिस पिंटो' या मुख्य भूमिकेत झळकणार आहे. आपल्याला अवगत नसलेल्या भाषेतील चित्रपटात मुख्य भूमिका साकारणं हे काहीसं कठीण असतं. यामुळेच या व्यक्तिरेखेसाठी एलीनं प्रचंड मेहनत घेतली आहे.मराठीत एन्ट्री करण्याबाबत एली म्हणाली, 'मला नेहमीच नवनवीन गोष्टी शिकायला आवडतात. स्वीडीश, हिंदी, तामिळ आणि कन्नड चित्रपटांनंतर 'इलू इलू'च्या निमित्तानं मला मराठी भाषेत काम करण्याची मिळाली. ही भूमिका मी साकारलेल्या आजवरच्या भूमिकांपेक्षा पूर्ण वेगळी आहे. त्यामुळे एका नव्या लूकमध्ये मी प्रेक्षकांसमोर येणार आहे. सुरुवातीला जेव्हा या चित्रपटाची ऑफर आली तेव्हा थोडं दडपण जाणवलं होतं, पण पटकथा आणि भूमिका समजल्यावर मी या संधीसाठी होकार दिला.एली अवरामसह वीणा जामकर, आरोह वेलणकर, मीरा जगन्नाथ, वनिता खरात, श्रीकांत यादव, कमलाकर सातपुते, आनंद कारेकर, निशांत भावसार, अंकिता लांडे, गौरव कलुस्ते, यश सणस, सोहम काळोखे, आर्या काकडे-जोशी, सिद्धेश लिंगायत हे कलाकार या चित्रपटात झळकणार आहेत.

# शाहिद कपूर आणि करीना कपूर दिसले एकत्र




मुंबई,-बॉलिवूडचे क्यूट एक्स कपल शाहिद कपूर आणि करीना कपूर खान पुन्हा एकदा एकाच छताखाली स्पॉट झाले आहेत. धीरूभाई अंबानीच्या वार्षिक समारंभात त्यांच्या मुलांचा परफॉर्मन्स पाहण्यासाठी शाहिद आणि करीना सहभागी झाले होते. यावेळी करीना पती सैफ अली खानबरोबर मुलगा तैमूरचा परफॉर्मन्सचा आनंद लुटताना दिसली. याशिवाय शाहिद कपूर देखील पत्नी मीरा राजपूतबरोबर दिसला. या फंक्शनचे अनेक फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहेत. एका व्हायरल झालेल्या व्हि.डिओत शाहिद कपूर त्याची एक्स गर्लफ्रेंड करीना कपूरच्या मागे बसलेला दिसत आहे. आता या दोघांचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर अनेकजण लाईक करत आहेत.

शाहिद कपूर आणि करीना कपूर एकत्र : व्हिडिओत करीना कपूर खाननं लाल आणि काळ्या रंगाच्या रंगसंगतीचा ड्रेस परिधान केला आहे. याशिवाय सैफ अली खाननं सूट परिधान केला आहे. करीना आणि सैफबरोबर बसून तैमूरच्या परफॉर्मन्सचा व्हिडिओ मोबाईलमध्ये घेताना दिसत आहे. तसेच मागच्या रांगेत शाहिद कपूर हा स्टाईलिश अंदाजात दिसत आहे. शाहिद हा अगदी करीनाच्या मागे बसल्याचा व्हिडिओत दिसत आहे. आता अनेक यूजर्स यांच्या व्हायरल व्हिडिओवर कमेंट्स देत आहेत. एका यूजरनं या पोस्टवर लिहिलं, ' मी हे पाहण्यास अजिबात तयार नव्हतो, पण हे घडले.' दुसऱ्या एकानं लिहिलं,' दोघांची जोडी चांगली होती, पण वेळेनं काहीतरी वेगळंच केलं.' शाहिद आणि करीनाचा हा व्हिडिओ अनेकांना आवडत आहेत.

शाहिद आणि करीनाचा व्हिडिओ व्हायरल : १७ वर्षापूर्वी शाहिद कपूर आणि करीना कपूर खान यांनी 'जब वी मेट' या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. त्यांचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला होता. या चित्रपटानंतर हे जोडपे कोणत्याही चित्रपटात एकत्र दिसले नाही. या चित्रपटानंतर करीना कपूरनं सैफशी लग्न केलं. शाहिदनं देखील मीरा राजपूतशी लग्न केलं. आता या दोन्ही स्टार्सना मुले आहेत. दरम्यान शाहिद आणि करिनाच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर ती शेवटी 'द बकिंगहॅम मर्डर्स' या चित्रपटामध्ये दिसली होती. आता पुढं ती 'तख्त' आणि 'वीरे दी वेडिंग २' या चित्रपटांमध्ये दिसणार आहे. तसेच शाहिद हा शेवटी 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' या चित्रपटामध्ये दिसला होता. आता पुढं तो 'बुल' आणि 'देवा' या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.

## प्रसाद ओक दिग्दर्शित सुशीला सुजीत रिलीजपूर्वीच या गोष्टीमुळे आला चर्चेत



मुंबई,-'सुशीला सुजीत' हा चित्रपट रिलीज होण्यापूर्वीचं एका वेगळ्या कारणासाठी चर्चेत आला आहे. स्वप्निल जोशी आणि सोनाली कुलकर्णी यांच्या भूमिका असलेल्या या चित्रपटाच्या म्यूझिकसह जगभर वितरण करण्याचे हक्क पॅनोरमा स्टुडिओ आणि पॅनोरमा म्यूझिकनं घेतले आहेत. यामुळं हा सिनेमा मोठ्या प्रमाणावर मराठीसह इतर भाषिक प्रेक्षकापर्यंत पोहोचण्याचे चान्सेस वाढले आहेत. विशेष म्हणजे या चित्रपटाचं दिग्दर्शन प्रसिद्ध अभिनेता प्रसाह ओक करत आहे. या चित्रपटाची निर्मिती स्वप्निल जोशी, प्रसाद ओक, मंजिरी ओक, संजय मेमणे आणि निलेश राठी संयुक्तपणे करीत आहेत.अभिनेता प्रसाद ओक आणि स्वप्नील जोशी यांचा 'जिलबी' हा चित्रपट प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. मराठी चित्रपटाचे आघाडीचे कलाकार असलेले हे दोन कलाकार एकत्र येणार असल्यामुळं हे एक मोठं आकर्षण असणार आहे. १७ जानेवारीला हा सिनेमा प्रदर्शित होणार याची उत्कंठा असतानाच त्यांनी एकत्रपणे कमा केलेल्या 'सुशीला सुजीत' चित्रपटाबद्दलचं उपडेट समोर आलं आहे.

पंचशील एन्टरटेन्मेंट आणि बिग ब्रेन प्रॉडक्शनच्या वतीनं बनत असलेल्या या चित्रपटाची संपूर्ण स्टार कास्ट अजून उघड झालेली नाही. परंतु या चित्रपटाचं पोस्टर रिलीज झाल्यामुळं हा एक मिश्कील विनोदी कथानक असलेला चित्रपट असणार याची खात्री वाटत आहे. या चित्रपटाची पटकथा आणि संवाद अजय कांबळे यांनी लिहिले आहेत, तर छायाचित्रणाची जबाबदारी अनुभवी सिनेमॅटोग्राफर संजय मेमाणे सांभाळणार आहेत. या चित्रपटाला संगीत वरुण लिखते यांचं असेल.'सुशीला-सुजीत' चित्रपटात स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक पहिल्यांदाच एकत्र येण्याचा योग्य जुळून आला आहे. गेल्या महिन्यात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेत या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झाली होती. चित्रपटाचं नाव समोर येताच 'सुशीला' आणि 'सुजीत' कोण असतील याबाबत चर्चांना उधाण आलं होतं. अखेर, सुजितच्या भूमिकेत स्वप्निल जोशी आणि सुशीलाची भूमिका सोनाली कुलकर्णी करणार असल्याचं पोस्टरवरुन स्पष्ट झालं आहे. पोस्टरमध्ये स्वप्निल आणि सोनाली दरवाजाच्या की होलमधून डोकावून पाहाताना आश्चर्यचकित झालेले दिसतात. कल्पक पोस्टरमुळे या सिनेमाच्या इतर प्रमोशन सामुग्रीची प्रतीक्षा करणं एवढंच प्रेक्षकांच्या हातात आहे. 'सुशीला-सुजीत' हा चित्रपट १८ एप्रिल २०२५ रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

## थ्री इडियट्आणि लगे रहो मुन्नाभाई चा लवकरच सिक्केल येणार!

मुंबई,-संजय दत्त याचा ममुन्नाभाई एमबीबीएसफ, मलगे रहो मुन्नाभाईफ आणि मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान याचा मथ्री इडियट्सफ सिनेमांवर आजही प्रेक्षक भरभरुन प्रेम देतात. आता यातच या सिनेमांच्या सिक्केलबद्दल काही माहिती समोर आली आहे. ती म्हणजे विधू विनोद चोप्राने मथ्री इडियट्सफआणि ममुन्नाभाई एमबीबीएसफ, मलगे रहो मुन्नाभाईफ्या चित्रपटांच्या सिक्केलबाबत एक महत्त्वाचा खुलासा केला आहे. विधू विनोद चोप्रा म्हणाले कि, मफ्सध्या फक्त मथ्री इडियट्सफ आणि मलगे रहो मुन्नाभाईफ या चित्रपटांच्या सिक्केलवर काम करत आहे आणि लवकरच चाहत्यांना एक अद्भुत सरप्राईज मिळेल. याशिवाय मी एका हॉरर कॉमेडीमध्येही काम करत आहे. मी अद्याप चित्रपटाचे शीर्षक निश्चित केलेले नाही. पुढे ते म्हणाले, ममला आशा आहे की मथ्री इडियट्सफ आणि मलगे रहो मुन्नाभाईफ या चित्रपटांचे सिक्केल लवकरच प्रदर्शित होतील. मला वाटलं असतं तर मी इतक्या वर्षात या चित्रपटांचे अनेक सिक्केल बनवू शकलो असतो. पण, असं केल्यानं मला खूप फायदा झाला असता. पण तो चित्रपट चांगला निघाला नसता तर मी काय केलं असतं. प्रेक्षकांना उत्तर देणं माझ्यासाठी कठीण झालं असतं.

## हे मी काय केले सोहेल खानचे ते चित्रपट, ज्यात काम केल्याचा सलमानला झाला पश्चाताप



मुंबई-बॉलिवूड अभिनेता सलमान खानने आपल्या करिअरमध्ये आतापर्यंत एकापेक्षा जास्त चित्रपट केले आहेत. पण त्याने असे काही चित्रपटही केले आहेत, ज्याचा त्याला स्वत:ला पश्चाताप होत आहे. त्यापैकी एक चित्रपट म्हणजे महॅलो ब्रदरफ, ज्याचे दिग्दर्शन सोहेल खानने केले होते. हा चित्रपट नक्कीच फ्लॉप ठरला, पण जेव्हा जेव्हा या चित्रपटाबद्दल तिन्ही भावांना प्रश्न विचारला जातो, तेव्हा ते स्वत:च त्यावर हसतात.

सलमान खानने अनेक वेळा आपल्या भावांना चित्रपटांमध्ये काम करून त्यांचे करिअर पुढे नेण्यासाठी मदत केली. पण अनेकवेळा असे घडले की त्यांचे चित्रपट केल्यानंतर त्यांच्या करिअरला फ्लॉप चित्रपट म्हणून टॅग केले गेले. या यादीत अनेक चित्रपटांचा समावेश आहे, पण इथे आपण फक्त हॅलो ब्रदर या चित्रपटाबद्दल बोलणार आहोत.

वास्तविक, सलमान खान कपिल शर्माच्या शोमध्ये अनेकवेळा पाहुणा म्हणून आला आहे आणि त्याने महॅलो ब्रदरफ्ची कथाही अनेकदा सांगितली आहे. पण सलमानने एकदा असे काही बोलून दाखवले होते की त्याला पश्चाताप झाला. खरंतर, जेव्हा कपिलने सलमान खानला विचारले की, तुझ्या भावांचे चित्रपट केल्यानंतर तुला कधी पश्चाताप झाला आहे का?

यावर सलमान हसून म्हणतो, मी जेव्हा चित्रपट केला तेव्हा मला तो आवडला होता, पण जेव्हा मी तो चित्रपट पाहिला, तेव्हा मला तो पूर्ण पाहता आला नाही आणि तो पाहिल्यानंतर मला असे वाटले की, मी हे काय केले?

सलमान पुढे म्हणतो, तो चित्रपट फ्लॉप ठरला होता आणि नंतर कळले की हे घडावे लागले, कारण तो चित्रपट खरोखर चांगला नव्हता. मी त्या चित्रपटात काय केले याचा विचार करूनही हसतो. सलमान बंधूंचे कौतुक केल्यानंतर तो म्हणतो, मी त्या चित्रपटात काम करायला नको होते.

१० सप्टेंबर १९९९ रोजी रिलीज झालेला हॅलो ब्रदर हा चित्रपट सोहेल खानने दिग्दर्शित केला होता. सलमान खान आणि अरबाज खान या दोघांनीही या चित्रपटात काम केले होते. या चित्रपटात राणी मुखर्जी आणि जॉनी लीव्हरही महत्त्वाच्या भूमिकेत दिसले होते. सॅकनिल्कच्या मते, हॅलो ब्रदर चित्रपटाचे बजेट ९ कोटी होते, तर चित्रपटाने जगभरातील बॉक्स ऑफिसवर २०.०६ कोटी कमावले. डअउछखडउ च्या त्याच डेटामध्ये, चित्रपटाचा निकाल फ्लॉप म्हणून घोषित करण्यात आला.

# घटस्फोटाच्या बातम्यांदरम्यान ऐश्वर्या राय अभिषेक बच्चनबरोबर झाली स्पॉट



मुंबई-अभिनेता अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय त्यांच्या घटस्फोटाच्या बातम्या बऱ्याच दिवसांपासून सुरू आहेत. दोघांनीही घटस्फोटाबाबत पुष्टी केलेली नाही. घटस्फोटाच्या बातम्यांदरम्यान, दोघेही नुकतेच आराध्याच्या शाळेत धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलमध्ये वार्षिक दिवसाच्या कार्यक्रमात पोहोचले होते. आता सोशल मीडियावर त्यांचे काही व्हिडिओ व्हायरल होत आहेत. यात ऐश, अभिषेक आणि अमिताभ बच्चन एकत्र दिसत आहेत. आराध्याच्या शाळेत वार्षिक दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात अनेक स्टार्सनं हजेरी लावली होती. आता सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले व्हिडिओ प्रचंड चर्चेत आहेत.अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय दिसले एकत्र : या व्हिडिओंच्या पोस्टमध्ये अनेक यूजर्स आता कमेंट्स करून आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. पहिल्या व्हिडिओमध्ये शाळेच्या गेटमधून प्रवेश करतानाचा अभिषेक बच्चन हा ऐश्वर्याची काळजी घेताना दिसत आहे. यावेळी अभिषेक हा ऐशच्या पाठीवर हात ठेवून समोर जात आहे. आता अभिषेकची ही काळजी पाहून अनेक यूजर्स त्यांना एकत्र राहण्याचा सल्ला देत आहेत. या व्हिडिओच्या पोस्टमध्ये एका चाहत्याने लिहिले, 'सासू आणि नणंदची नजर लागली नाही पाहिजे.' दुसऱ्या एकाने लिहिले, 'या दोघांना एकत्र पाहून खूप छान वाटले.' आणखी दुसऱ्या एकाने लिहिले, 'मला खूप चांगले वाटले हे दोघे एकत्र आहे.' याशिवाय काहीजण या व्हिडिओच्या पोस्टमध्ये फायर आणि हार्ट इमोजी पोस्ट करत आहेत.आराध्याचा परफॉर्मन्स : दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये अभिषेक, ऐश्वर्या आणि अमिताभ तिघेही आराध्याच्या परफॉर्मन्सचा आनंद लुटताना दिसत आहे. याशिवाय दोघेही आपल्या मोबाईलमध्ये आराध्याचा परफॉर्मन्स रेकॉर्ड करताना दिसत आहे. व्हिडिओ समोर आल्यानंतर चाहत्यांमध्ये या जोडप्याच्या नात्याची चर्चा पुन्हा एकदा रंगली असून काहीजण, आता देखील दोघांमध्ये काही ठिक नसल्याचे म्हणताना दिसत आहेत. अभिषेक आणि ऐश्वर्या दोघेही बऱ्याच दिवसांपासून एकत्र दिसले नाही. दरम्यान मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंतच्या लग्नासाठी बच्चन कुटुंब एकत्र आले होते. ऐश्वर्या आपल्या मुलीबरोबर या लग्नात वेगळी आली होती. यानंतर ऐश आणि अभिषेकच्या घटस्फोटाच्या बातम्या समोर येऊ लागल्या. यानंतर अभिषेकचं नाव 'लंचबॉक्स' फेम अभिनेत्री निम्रत कौरबरोबर जोडण्यात आले होते.




# नाट्य स्पर्धेत सहा दशकांत प्रथमच ११ संघांचा सहभाग

## लातूर येथे ६३ वी राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा; नवोदित कलाकारांची संख्या अधिक

लातूर/प्रतिनिधीः- यंदा महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा लातूर येथे पार पडली. प्रथमच रंगभूमीवर सर्वाधिक नवोदित कलावंतांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत रसिकांना मंत्रमुग्ध केले. गतवर्षी ८ संघ होते यंदा ही संख्या प्रथमच ११ वर पोहचली.

या कलावंतांनी वैचारिक नाटकांसह ग्रामीण ढंगाच्या नाटकांचे प्रयोग यशस्वी केले. ४ डिसेंबरपासून १७ डिसेंबरपर्यंत सुरु असलेल्या या नाट्य स्पर्धेस नाट्यरसिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. हजारोंच्या संख्येने रसिक मार्केट यार्डातील स्व. दगडोजीराव देशमुख स्मृती सभागृहात प्रयोगाला जमले होते.या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील आतापर्यंतचे सर्वाधिक ११ नाट्य संघांनी सहभाग घेतला होता. लातूर शहर एक सांस्कृतिक शहर असल्यामुळे येथे नाट्यरसिकांनी



संख्या खुप मोठी आहे. स्पर्धेतील नाटकाची सुरुवात सायंकाळी ७ वाजता असून नाट्यरसिक अगोदरच आसनस्थ होत होते. ग्रामीण ढंगांसह विविध विषयांवरील नाटकं सादर केले. स्पर्धेसाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, संचालक बिभीषण चवरे व लातूर केंद्राचे समन्वयक बाळकृष्ण धायगुडे यांनी परिश्रम घेतले आहेत. तांदुळजा येथील युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे 'गुलाल' हे नाटक सादर झाले. लातूर येथील उन्नती फाउंडेशनचे 'आज महाराष्ट्र दीन आहे' लातूरच्या सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानचे 'परफेक्ट मिस मॅच', उदगीरच्या स्पर्श बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे 'कायनी दोस्त', लातूरच्या सह्याद्री प्रतिष्ठानचे 'पुन्हा पुन्हा मोहोंजोदाडो', लातूरच्या नाट्य स्पंदन प्रतिष्ठानचे 'सभ्य गृहस्थ हो!', लातूरच्या कलोपासक मंडळाचे 'मी कुमार', लातूरच्या कलारंगचे 'भोवरा', लातूरच्या ग्राम स्वराज संस्थेचे 'खेळ', उदगीरच्या धर्मवीर राजे प्रतिष्ठानचे 'गावगुंड शेवटी झाला थंड' आणि शेवटी अभयरत्न सामाजिक विकास संस्थेचे 'चाफा सुगंधी' नाटक सादर झाले.

स्पर्धेला सहा दशकांची मोठी परंपरा कायम महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालना लयाच्या वतीने ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा लातूर येथे आयोजित केली. या स्पर्धेला सहा दशक उलटून गेली. या स्पर्धेत घडलेल्या नवोदित कलावंतांनी विविध सांस्कृतिक क्षेत्रात यश संपादन केले आहे. यंदा स्पर्धेत अभिनय शिवाय रंगभूमीवरील इतरत्र क्षेत्रात नवोदितांनी मोलाची कामगिरी दाखवली आहे. यात लेखन, संगीत, डेकोरेशन, दिग्दर्शन आदीचा उल्लेख करता येतो. सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी मिळत आहे.

# डॉ. मयुरी जाधव हिच्या शिवविवाहनिमित्ताने मुलींच्या वस्तीगृहासाठी एक लाखाची देणगी

निलंगा/आयुब बागवान :- वृंदावन मंगल कार्यालय निलंगा येथे १५डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळीगोरज मुहूर्तावर ६. २१ वाजता .जाधव एम एम राहणार बामणी ह.मु. निलंगा .यांची सुकन्या डॉक्टर मयुरी जाधव हीचा विवाह सुभाषराव प्रभाकरराव वैरागर पाटील राहणार ताडपांगरी ह मु गंगाखेड यांचे चिरंजीव डॉक्टर डॉ अजय यांच्यां सोबत शिवविवाह अतिशय थाटामाटात संपन्न झाला .या विवाहाच वैशिष्ट्ये म्हणजे गोरगरीब शेतकरी कष्टकरी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी यांचे पाल्य,अनाथ मुलीं यांच्यासाठी लातूर येथे २६ गुंठ्यामध्ये वसतिगृहाचे बांधकाम मराठा सेवा संघाच्या वतीने होत असून या वस्तीगृहासाठी जाधवांची कन्या डॉक्टर मयुरी व डॉ अजय यांच्या शिवविवाहाच्या च्या निमित्ताने मुलींच्या वस्तीगृहासाठी एक लाख रुपयाचा धनादेश वधू पिता जाधव एम एम जिल्हा सचिव मराठा सेवा संघ लातूर यांनी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ऍड



पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गर्शनानुसार, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार,महाराष्ट्रचे मार्गदर्शक प्राध्यापक अर्जुन तनपुरे सर व जिल्हाध्यक्ष इंजिनिअर रोहन जाधव, यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. हा विवाह शिवधर्म पद्धतीने लावण्यात आला. अक्षता ऐवजी फुलांच्या पाकळ्याची उधळण वधुवरांच्या माथ्यावर करण्यात आली. विवाहाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन व छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करून करण्यात आली. प्रथम वधू वर यांच्या माता पित्याने एकमेकांना ग्रंथ भेट देऊन एकमेकांचे स्वागत केले. अमर पाटील यांनी जिजाऊ वंदना गायली. वधू-वरांनी वैयक्तिक व संयुक्त शपथ घेतली .शिव पंचके गाऊन हा विवाह संपन्न झाला. शिव सेवक म्हणून प्रसिद्ध कीर्तनकार शिवश्री मधुकर महाराज बारोळकर नांदेड व शिवश्री लिंबराज सूर्यवंशी यांनी भूमिका बजावली. उपस्थित मान्यवरांना ग्रंथ भेट देऊन व महिलांना जिजाऊ चरित्र भेट देऊन सन्मान करण्यात आला. विवाहपिठावर वर पिता शिवश्री सुभाष प्रभाकरराव वैरागर पाटील वर माता शिवमती मंगल सुभाषराव वैरागर पाटील तसेच वधू पिता शिवश्री मारुती माधवराव जाधव वधू माता शिवमती रंजना मारुतीराव जाधव उपस्थित होते. निवेदक म्हणून शिवश्री प्रा सतीश हानेगावे व शिवश्री प्रा संभाजी नवघरे यांनी भूमिका बजावली. यावेळी विवाहासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. या आगळ्या वेगळ्या प्रकारच्या विवाहाचे व सामाजिक बांधिलकी म्हणून देणगी दिली त्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# विठ्ठल मंदिराचा ९ कोटीतून होणार जीर्णोद्धार

रेणापूर/प्रतिनिधीः- रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील ऐतिहासिक व पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी आमदार रमेश कराड यांच्या प्रयत्नांतून ९ कोटी ३४ लाख ४९ हजार रुपयाचा निधी शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्रालयातून मंजूर झाला असून भारतातील ७३ मंदिराच्या यादीत पानगावच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा समावेश करण्यात आला आहे. या मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती समिती अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी दिली.

रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीर हे उत्तर चालुक्य कालीन १२-१३ व्या शतकातील आसावे, या मंदिरावर होयसळ,





चालुक्य आणि काकतीय यांच्या कालखंडातील स्थापत्य कलेचा प्रभाव दिसून येतो. मंदिरातील सभामंडप आणि गर्भग्रह हेमाडपंथी स्थापत्य शैलीचे दिसून येते. सभामंडपात कलात्मक स्तंभाची रचना असून मंदिराच्या बाह्य भागात भौमितिक नक्षीकाम तसेच देवदेवतांची शिल्पे कोरलेली दिसून येतात. घरांच्या गर्दीत झाकले गेलेल्या मंदिराचा फक्त मंडप बाहेरुन दिसतो.

ज्याला आज लोकांनी पंढरपुरच्या धर्तीवर नामदेव पायरी असे संबोधले गेले आहे. आत शिरल्यावर मोकळ्या जागेतून आपल्याला उत्तरेकडून मुक मंडप दिसतो. तसेच पूर्व आणि पश्चिमेकडे देखील अर्ध मंडप दृष्टीत पडतात. तीन मुक मंडप मधला चौरस आकृती सभामंडप आणि चौकोनी गाभारा, आसा विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा आकार दिसतो. तिन मुक मंडपाना पायऱ्या सोडून जावे लागते. वामन भिंतीवर उतरत्या आकाराचे (कक्षासने) बसण्याचे कट्टे आहेत. त्या कट्ट्याच्या बाहेरील बाजूस विविध थरामध्ये सुंदर आणि कोरीव नक्षीदार काम आहे.

कणी कुंभ थराबरोबरच गज आणि रत्न थरांची पट्टी सर्वत्र कोरलेली दिसते. तिन मुक मंडप आणि सभामंडपामध्ये वामन भिंतीवर शंकरपाळ्यासारख्या आकाराचे आर पार नक्षी केलेली आत हवा येण्यासाठी खिडक्या कोरलेल्या आहेत. सभामंडपात दोन भिंतीवर एका कोरण्यात गणेशाची मुर्ती आणि दुसऱ्या कोरण्यात एका नविन देवाची मूर्ती बसवलेली आहे. गर्भग्रुहात उत्तर मध्य युगात बसवलेली विठ्ठल रुक्मिणी ची गोंडस मुर्ती पहायला मिळते. येणारे वारकरी पायावर डोकं ठेऊन दर्शन घेताना पंढरपुरच्या विठ्ठलाची आठवण येते.

मंदिराची पडझड, २०२२ मध्ये स्मारक समिती पानगाव विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील देखभाल नसल्यामुळे मंदिराची पडझड झाली होती. काही मंदिराच्या बाहेरील मूर्तीची तोडफोड झाली होती. २६ जून २०२२ रोजी इतिहास संकलन संस्था लातूर व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पानगावच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या क्षेत्रभेट व अभ्यास दौरा निमित्त प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक अमोल गोटे यांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिरास राज्य सुरक्षित स्मारक घोषित करण्यासाठी प्रयत्न केले.

# मराठी भाषा विद्यापीठ, व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांची निवड !



लातूर/प्रतिनिधी:- दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिता सांगोले यांची माननीय कुलपती सी.पी राधाकृष्णन महोदयांनी महाराष्ट्र मराठी विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे स्थापन झालेल्या मराठी भाषा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. प्रोफेसर डॉ. सुनिता सांगोले दयानंद कला महाविद्यालय, लातूर या मराठी पदव्युत्तर व संशोधन विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. मराठी साहित्य व भाषा विज्ञानाच्या अभ्यासक असलेल्या डॉ. सुनीता सांगोले यांची आजवर १० पुस्तके प्रकाशीत झालेली आहेत. तर विविध संशोधनपर नियतकालीकांतून त्यांचे ४३ शोधनिबंध प्रकाशीत झाले आहेत. गेली २५ वर्षे अध्यापन- संशोधन क्षेत्रांत आपले योगदान देत असलेल्या प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी भारत सरकार व महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध महत्त्वपूर्ण समित्यांवर कार्य केले आहे. गुलबर्गा विद्यापीठ, गुलबर्गा; स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठांतून मराठी अभ्यासमंडळ सदस्य; विविध विद्यापीठांतून अभ्यास मंडळ, प्राध्यापक निवड समिती, परीक्षा मंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. एक चांगली वक्ता, प्रभावी संवादक, संशोधक आणि कवयित्री म्हणून लौकिक असलेल्या डॉ. सुनीता सांगोले यांच्या व्यवस्थापन परिषदेवरील निवडीबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा.अरविंदरावजी सोनवणे, मा. रमेशकुमार राठी, व ललितभाई शाह, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष मा.संजयजी बोरा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, नवनियुक्त उपप्राचार्या डॉ.अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिलीप नागरगोजे,पर्यवेक्षक डॉ.प्रशांत दीक्षित, स्टाफ सचिव प्रा. सुरेश क्षीरसागर, कार्यालयीन अधिक्षक संजय व्यास सर्व विभागाचे प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# शेतीसाठी दिवसा विद्युत पुरवठा सुरु करावा

## मनसेचे संतोष नागरगोजे यांचे महावितरण मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन

रेणापूर/प्रतिनिधीः- तालुक्यातील अनेक गावाच्या शिवारामध्ये हिंस्र प्राण्याचा वावर होत असल्याचे बोलले जात आहे. दिवसा शेतीला पाणी देण्यासाठी विद्युत पुरवठा सुरु नसल्यामुळे रात्री शेतकरी पिकाला पाणी देत आहे. तेव्हा रात्री ऐवजी दिवसा विद्युत पुरवठा सुरु करावा, अशी मागणी महाराष्ट्र निर्माण शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष संतोष नागरगोजे यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे मागणी केली.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सद्या रब्बी पिके शेतीमध्ये आहेत. तसेच



यावर्षी नविन उसाची लागवडही मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. तेव्हा या पिकांना पाणी देणे गरजेचे आहे. म्हणून शेतकरी दिवसा विद्युत पुरवठा बंद असून रात्रीचा विद्युत पुरवठा सुरु आहे. तेव्हा रात्री शेतीला पाणी देताना शेतात बिबटया, तडस, लांडगा, रानडुक्कर, साप या प्राण्याच्या हल्ल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागत आहे.त्यामुळे दररोज जीव मुठीत घेवून शेतीला पाणी देणे शक्य नसल्याने रात्री विद्युत पुरवठा बंद करुन, दिवसा विद्युत पुरवठा शेतीसाठी सुरु करण्यात यावा. या मागणीचे बुधवारी महावितरणचे लातूर विभागाचे अधीक्षक अभियंता सांगळे यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा उच्च दाबाने विद्युत पुरवठा करण्यात यावा, या मागणीसाठी निवेदन देण्यात आले आहे. यावेळी मनसे शेतकरी सेना प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, मनसे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष पांडुरंग कदम, कामगार सेना जिल्हा उपाध्यक्ष अनिल पांढरे, देवा पवार, अनिल सुरवसे यांनी हजेरी लावली. पिकांना पाणी देणे गरजेचे असते तसेच यावर्षी नविन उसाची लागवडही मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. तेव्हा या पिकांना पाणी देणे गरजेचे आहे. म्हणून शेतकरी दिवसा विद्युत पुरवठा बंद असून रात्रीचा विद्युत पुरवठा सुरु आहे. तेव्हा रात्री शेतीला पाणी द्यावे लागते.

# कासार बालकुंदा येथे सोमनाथ सुर्यवंशी यांना आदरांजली

निलंगा/आयुब बागवान :- भिम नगर, कासार बालकुंदा - परभणी प्रकरणातिल निष्पाप, गरीब कुंटुबातील, होतकरु, सामाजिक कार्य करणारा , संविधान प्रेमी, आदर्श विद्यार्थी सोमनाथ सुर्यवंशी (रामलिंग मुदगड) यांचा पोलिस कोठडीत मृत्यु झाला.ही घटना अमानविय कृत्यातुन झाल्यामुळे आंबेडकरी अनुयायी गावागावातुन निषेध करत आहे



.तसेस कासार बालकुंदा येथील अनुयायांनी कालकथित सोमनाथ सुर्यवंशी यांच्या प्रतिमेस हार,पुष्प अर्पण, मेणबत्ती प्रज्वलीत करुण आदरांजली वाहिली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अपशब्द वापरणार्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व परभणी प्रकरणातील घटनेसी संबंधित असणारे कर्मचारी यांचा जाहीर निषेध केला.

# कुठे तुरीचा खराटा, कुठे उत्पादन वाढीची आशा: नुकसान भरपाई मिळावी , हंडरगुळीत मागणी

हंडरगुळी/प्रतिनिधीः- यंदा खरीपातील सोयाबीन हे पिक निसर्गासह रोगराईच्या चक्रव्यूहात अडकले होते. अगदी अशीच गत तुर या पिकांची होऊ शकते. असे चित्र हळी व हंडरगुळी शिवारातील हलकी शेती असलेल्या व पाण्याचे स्तोत्र नसलेले बहुतांश शेतकऱ्यांच्या तुरीचा खराटा झाल्याचे दिसते. तर चांगली शेती व पाण्याचे स्तोत्र असलेल्या शेतकरी बांधवांची तुर शेंगाने लगडल्याने व दरही चांगला असल्याने उत्पादन ही चांगले होईल, अशी अशा वाटते. एकंदरीत पाहता बहुतांश शेतकरी बांधवांची तुर रोग ग्रस्त होऊन तुरीचा खराटा झाल्यात जमा आहे.यामुळे नुकसान भरपाई मिळावी. अक्षीहळी व भागातील शेतकऱ्यांची मागणी आहे. यंदा या भागात पावसाने हा:हाकार माजवला होता. म्हणुन खरीपातील सोयाबीनसह तुरीचे ही मोठे नुकसान झाले आहे. एकीकडे निसर्गाचा मारा तर दुसरीकडे खरीप पिकांवर विविध प्रकारच्या रोगांचे आक्रमण. यामुळे खरीप हंगामासह शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडला असून हजारो एकर क्षेत्रातील खरीप पीके हातातुन गेल्याने शेतकरी बांधव नाराज झाला आहे. तरीही अद्याप ना पीक विमा मिळाला ना, अतिवृष्टीची रक्कम.त्यात भर म्हणुन सध्या तुर हे पीक निसर्गासह रोगराईच्या चक्रव्यूहात अडकल्याने काहीच्या वावरातील तुरीला शेंगा ऐवजी हिरवा व वाळलेला पाला व तुरीचा खराटा दिसत आहे. म्हणुन याची संबंधितांनी पंचनामे करुन नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे. सत्तेत कुणीही बसो! शेतकऱ्यांचे संकट दुर होईना, आणि नुकसान झालेल्या पिकांची भरपाई मिळेना, असे म्हणणे चुकीचे होणार नाही. अतिपावसाने झालेले नुकसान व पीक विमा याची भरपाई मिळणार का? चर्चा आहे.सोयाबीनसह तुरीचे ही नुकसान,शेतकरी संकटात खरीपातील सोयाबीनसह तुरीचे ही मोठे नुकसान झाले आहे. एकीकडे निसर्गाचा मारा तर दुसरीकडे खरीप पिकांवर विविध प्रकारच्या रोगांचे आक्रमण. यामुळे खरीप हंगामासह शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडला असून हजारो एकर खरीप पीके गेल्याने शेतकरी नाराज आहे.



आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के
एका तासात करून मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

# प्रात्यक्षिकातून दाखविले जीव दानाचे महत्व : मध्य रेल्वेचा उपक्रम





सोलापूर(प्रतिनिधी)– मध्य रेल्वेच्या नागरिक सुरक्षा संघटना तर्फे मंडळ रेल प्रबंधक सोलापूर येथे कार्यालयीन आवारात नागरिक सुरक्षा संबंधित प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. प्रामुख्याने संकटात सापडलेल्या प्रसंगातून नागरिकांना/प्रवाश्याना कशाप्रकारे मदत करावी आणि त्यांचा जीव कसा वाचवावा यासंबंधात प्रात्यक्षिके यावेळी दाखविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने आग लागल्यावर त्या आगीवर कसे नियंत्रण मिळवावे, आगीत अडकलेल्या नागरिकांना कसे वाचववे, ऐन वेळी जर एखाद्याला हृदय विकाराचा झटका आला तर त्याला सीपीआर देऊन कश्या प्रकारे त्याचा जीव वाचवला पाहिजे याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच अपघात / आपदा झाल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या विमोचन पद्धतीद्वारे क्षतिग्रस्त स्थितीत अडकलेल्या लोकांना सुरक्षित स्थळी कसे काढावे आणि त्यांच्यावर प्रथमोपचार कसे करावे हे देखील दाखविले.

हे प्रात्यक्षिक सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री नीरज कुमार दोहरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. तसेच या कार्यक्रमाचे नियोजन हे वरिष्ठ विभागीय सिग्नल एवं दूरसंचार व्यवस्थापक श्री राहुल गौर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम सफलतापूर्वक पार पाडण्यासाठी श्री आशिष कांचकर श्री सुब्रमणि शंकर आणि श्री रवींद्र राठोड यांचे सहकार्य लाभले.सदरच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हे वरिष्ठ नागरिक सुरक्षा निरीक्षक श्री एस एस वैद्य यांनी केले.

# संत गाडगेबाबा स्मृती दिनानिमित्त गाडगेबाबा चौकात राष्ट्र संत गाडगेबाबांना अभिवादन



लातूर (प्रतिनिधी)– दिनांक २० डिसेंबर रोजी येथील संत गाडगेबाबा चौकात थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या स्मृती दिनानिमित्त संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस लातूर शहर महानगरपालिका माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार,माजी नगरसेवक आनंत गायकवाड ,लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे , सचिव बाबासाहेब बनसोडेयांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करून संत गाडगेबाबा चौक फलकाचे अनावरण करण्यात आले.


या वेळी प्रस्तविकात प्रा गिरीधर तेलंगे यांनी लातूर शहर महानगरपालिका कडून दिनांक २१/१२/२०१६ रोजीच्या ठराव क्रमांक ११६ नुसार स्क्राप मार्केट गोरक्षण मार्गे रींग रोड चौकास संत गाडगेबाबा चौक नावाचा ठराव घेऊन तसे फलक बसवण्यात आले होते नुकतेच राष्ट्रीय मार्ग यांच्या कडून बाय पास रींग रोड विकास कामात सदरील फलक काढण्यात आला होता आज संत गाडगेबाबा यांच्या स्मृती दिनानिमित्त चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते संत गाडगेबाबा नावाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले . या वेळी प्रमुख पाहुणे चंद्रकांत बिराजदार यांनी आपल्या भाषणात थोर समाज सुधारक संत गाडगेबाबा यांनी माणसात देव शोधून मानवाचे शत्रू अंधश्रद्धा,अशिक्षितपणा,व अस्वच्छते विरोधात प्रबोधन करीत स्वतः स्वच्छता अभियान राबवित समाजाला स्वछतेचे महत्व पटवून दिल्याचे सांगितले या वेळी ग्यानदेव तेलंगे, गणपतराव तेलंगे,नर्सिंग जाधव,प्रा वैजनाथ जाधव , प्रशांत सुरवसे,सुधाकर सुरवसे, कृष्णा तेलंगे,बालाजी तेलघाणे,दत्ता पवार ,धोंडिबा चवळे,गणेश पवार इत्यादि उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा गिरीधर तेलंगे,मठपती मामा,केंद्रे सर ,गणेश कवठाळे इत्यादींने प्रयत्न केले उवस्थितांचे आभार प्रदर्शन गणपराव तेलंगे यांनी मानले.

# राज्यस्तरीय आपत्ती, व्यवस्थापन शिबीरात दयानंद कला महाविद्यालयाच्या स्वंयसेवकांचा सहभाग



लातूर (प्रतिनिधी)– येथील दयानंद कला महाविद्यालय, लातूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग आव्हान २०२४ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती Chancellors Brigad महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्ती व्यवस्थापन पुर्व तयारी प्रशिक्षण शिबीर दि.७ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४ रोजी अमरावती या ठिकाणी संपन्न झाले. या मध्ये दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना **(NSS)** या विभागाचे स्वंयसेवक पवार निखिल, गोरे सुरज व स्वंयसेवीका निकीता कापसे, आरती वाघमारे यांचा सहभाग होता. सदरील शिबीरामध्ये नैसर्गिक आपत्ती तसेच सर्पदंश प्रथोमउपचार, अग्णिशामक व्यवस्था व आपत्ती आल्यानंतर करावयाचा तत्कालीन समायोजन या सर्वाचे प्रात्यक्षिकासहित प्रशिक्षण देण्यात आले. हे आपत्ती व्यवस्थापन शिबिर यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल स्वयंसेविका व स्वयंसेवकांचे कौतुक करताना दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे व पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित वरिष्ठ महाविद्यालयातील विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम हे उपस्थित होते

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्यासोबत मोफत वीज योजनेची भरपाई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन




लातूर(प्रतिनिधी)– शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज देण्याची योजना पुढील पाच वर्षे चालू ठेवण्याचा सरकारचा निर्धार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांना मोफत वीज देण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत दिली. अत्यंत कमी काळात योजनेची अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी ऊर्जा विभागाचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री . देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना दिवसा अखंडित थ्री फेज वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेचे काम सुरू केले आहे. त्या अंतर्गत एमएसईबी सोलर ग्रो पॉवर लिमिटेड ही देशातील पहिली शेतकऱ्यांना वीज देणारी कंपनी स्थापन केली. कंपनीच्या अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मीतीचे सौर ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू केले आहे. यामध्ये ८४२८ कृषी वाहिन्या (फीडर्स) सौर ऊर्जेवर चालवणार आहोत. आतापर्यंत ६६९ मेगावॅट एवढी क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यातून १, ३०,४८६ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा सुरू केला आहे. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅटची कामे पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्याचा प्रयत्न आहे.

त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांकडून आगामी पाच वर्षात विजेचे बिल घ्यायचे नाही, हा निर्धार कायम आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी अर्थसंकल्पावर सध्या १५ हजार कोटी रुपयांचा भार पडतो तेवढेच पैसे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत. सध्या आठ रुपये प्रतियुनिट दराने मिळणारी वीज शेतकऱ्यांना दीड रुपये प्रती युनीट दराने उपलब्ध केली जाते. आता हे बिलही सरकार भरते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत तीन रुपये प्रति युनिट दराने वीज मिळणार असल्याने वीज खरेदीत दहा हजार कोटी रुपये वाचतील. तसेच अनुदान आणि क्रॉस सबसिडीच्या पाच हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांच्या मोफत वीज योजनेचे पैसेही मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत.

मा. मुख्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीबद्दल आपण ऊर्जा विभागाचे अभिनंदन करतो. खूप कमी काळामध्ये योजनेसाठी जमीन शोधणे, त्यावर सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा काढणे, विकसक निवडणे हे काम पारद-र्शीपणे करण्यात आले. कमीत कमी दरात वीज उपलब्ध करण्यासाठी रिव्हर्स बिडिंग पद्धतीने काम करण्यात आले.

त्यांनी सांगितले की, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे गतीने काम चालू आहे. त्यासाठी ९ लाख कृषी पंप उपलब्ध आहेत. त्यामुळे पेड पेंडिंग आता संपुष्टात येईल. आतापर्यंत २,३६,१८६ सौर कृषी पंप आस्थापित केले आहेत. जेव्हापासून सौर पंप योजना सुरू झाल्या त्या काळात जेवढे सौर पंप लावले त्यापेक्षा अधिक सौर पंप गेल्या एका वर्षात आस्थापित केल्या आहेत. या कामगिरीबद्दल विभागाचे त्यांनी अभिनंदन केले.

आपल्या सरकारने ऊर्जा क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात योजना सुरू केल्या आहेत. राज्याची आतापर्यंतची स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४४ हजार मेगावॅटची आहे. आता ५४ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार झाले आहेत. सध्या वीज पुरवठ्यामध्ये १६ टक्के वीज अपांपरिक तर ८४ टक्के पारंपरिक आहे. आपण हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के वीज पुरवठा अपारंपरिक विजेचा म्हणजेच हरित ऊर्जेचा असेल तर ४८ टक्के वीज पुरवठा पारंपरिक असेल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

निलंगा शहरातील एलआयसर विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off:(02384)242224,9422612239,9422658396

# कातपुर येथे मोफत शिलाई मशीन चे प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन



लातूर (प्रतिनिधी)–विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने लातूर शहरातील मौजे कातपुर येथे ट्वेंटीवन ॲग्री ली च्या संचलिका सौ अदिती अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत शिलाई मशीन चे प्रशिक्षण केंद्राची सुरूवात करण्यात आली.

या प्रशिक्षणाचे उद्घाटन ट्वेंटीवन ॲग्री ली च्या संचलिका सौ अदिती अमित देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला. ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रश्न वाढत जात आहे यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण करून स्वयंरोजगार उपलब्ध करण्याच्या संधी तयार करत आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ९६ महिलांनी आपला सहभाग नोंदविला आहे यावेळी संस्थेच्या समन्वयक संगीता मोळवणे, सरपंच– रेणुकाताई तुकाराम आयतनबोयणे उपसरपंच – विष्णू (मनोज) बालासाहेब देशमुख, ग्रा.प. सदस्य – महादेव प्रभाकर मस्के,माजी ग्रा.प. सदस्य – विमलबाई राजाराम गलांडे,भाऊसाहेब बापुराव लोखंडे, ट्रेनर सेजल सुर्यवंशी ,संस्थेचे सोशल प्लॅनर गजानन बोयणे,गावातील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

**मार्क मेमो हरवले आहे**
शंकर मनोज रुपनर या नावाची इ.१२ वी पासचे मार्क मेमो निलंगा ते लातूर बस प्रवासात हरवले आहे कोणास सापडल्यास खलील नंबर वर संपर्क करावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल
–संपर्क:–मो–९६९९३६५२५४

# औसा तालुक्यात भूकंपाची नोंद नाही; नागरिकांनी घाबरु नये : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे आवाहन

लातूर (प्रतिनिधी)–औसा तालुक्यातील गुबाळ, नांदुर्गा परिसरात भूगर्भातून आवाज आल्याबाबत माहिती प्राप्त झाल्यानंतर नवी दिल्ली येथील राष्ट्रीय भूकंपमापन केंद्राकडे चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार या परिसरात भूकंपाची कोणतीही नोंद झालेली नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत करण्यात आले आहे.

औसा तालुक्यातील गुबाळ, नांदुर्गा परिसरात भूकंपाची नोंद झालेली नाही.

तसेच औशाचे तहसीलदार यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे या परिसरात कोणतेही नुकसान झालेले नाही. भूकंपाची नोंद नसल्यामुळे नागरिकांनी घाबरून जावू नये, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्यावतीने करण्यात आले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**NOTICE FOR SRM**

The Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, MSETCL, Latur (the Employer) invites online (e-Tender) offers on percentage rate basis and under two bid system (technical bid and commercial bid) from civil contractors on Mahatransco e-tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Name of works | Tender No. | Estimated cost (In Rs.)/ time limit / EMD (In Rs.) | Cost of the Tender + GST (In Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | **3rd call to work of replacement of existing damaged cable trench covers at 132Kv substation Renapur, Koyna & Chakur, Dist: Latur.** | **MSETCL/EEC/EHV/CCCM/ LTR/2024-25/ T-20 (3rd call) (RFX No.7000034675)** | **Rs.2366994.00/- 90 days/ Rs. 23669.94-** | **Rs. 590** |

**Start Dt. & Time: 20.12.2024 14:00**
**End Dt. & Time: 30.12.2024 14:00**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: - The Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, MSETCL, Latur.
The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Executive Engineer (Civil) EHV CCCM Division, MSETCL, Latur**

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/21-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४,पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२१–२३